एकादशी

अशोककाका कुलकर्णी

एकादशी व्रताचे महत्त्व

==================

अ. पद्मपुराणामध्ये एकादशी व्रताचे पुढीलप्रमाणे महत्त्व सांगितले आहे.

अश्वमेधसहस्त्राणि राजसूयशतानि च ।

एकादश्युपवासस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ।।

[पद्मपुराण]

अर्थ : अनेक सहस्र अश्वमेध यज्ञ आणि शेकडो राजसूय यज्ञ यांना एकादशीच्या उपवासाच्या सोळाव्या कलेइतकेही, म्हणजे ६ १/४ प्रतिशत इतकेही महत्त्व नाही.

===

एकादशी केल्याने साधकाच्या साधनेतील बाधा नाश पावतात.

मनाचे पावित्र वाढते .बुध्दी सात्विक होते.

शरिरातील रक्त शुध्दी होते जे अपवित्र अन्न खाल्याने अशुध्द झालेले असते.

यश आल्याने धन प्राप्ती होते.

साधनेसाठी दृढ श्रध्दा व विश्वास निर्माण होतो.आपल्या सांगण्यावरुन कोणी एकादशी केली तर सांगणारा आर्धे फल प्राप्त होते.

एकादशी हे महाव्रत असल्याने जे हे करतात त्यांची पितृपिडा कमी होते,नातलगातील प्रेत पिश्चाच योनीतील जीवांना मुक्ती मिळते.

एकादशीला हरीवासार म्हटले आहे, हरिवासार म्हणजे श्रीहारींचा दिवस! आजचा दिवस श्रीहारींसाठी आहे. त्यामुळे खाणे-पिणे बंद, केवळ हरींचे भजन, हरींचेच स्मरण, हरिनामाचा जप, हरींसाठी रात्रीचे जागरण,

हरिकथा श्रवण, केवळ हरीच संपूर्ण एकादशी व्रत आहेत.

समस्त वेद शास्त्रांचे सर आपल्या अभंगातून सांगताना संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज म्हणतात-

ज्यासी नावडे एकादशी। तो जिताची नरकवासी।।

ज्यासी नावडे हे व्रत। त्यासी नरक तोही भीत॥

ज्यासी घडे एकादशी। जाणे लागे विष्णुपाशी।।

तुका म्हणे पुण्यराशी। तोचि करी एकादशी।।

“ज्याला ही एकादशी आवडत नाही, तो जिवंतपणी नरकाचा रहिवासी आहे. ज्याला हे वर्त आवडत नाही, त्याला नरकसुद्धा घाबरतो. जो एकादशी व्रताचे पालन करतो, त्याला निश्चित वैकुंठाची प्राप्ती होते. तुकाराम महाराज म्हणतात ज्याने गतजन्मात पुण्यराशी गोळा केल्या आहेत, तोच एकादशी व्रताचे पालन करतो.”

प्रत्येक मासातून येणाऱ्या दोन्ही एकादशीना भोजन न करण्याचे उल्लेख शास्त्रांमध्ये आहेत. त्याचे सार श्री तुकाराम महाराजांनी पुढील प्रमाणे सांगितले आहे-

एकादशीस अन्नपान। जे नर करती भोजन।।

श्वान विष्ठेसमान। अधम जन ते एक ॥

तया देही यमदूत। जाले तयाचे अंकित।।

तुका म्हणे व्रत। एकादशी चुकलिया।।

“जे लोक एकादशीस अन्न भक्षण करतात, भोजन करतात ते अतिशय पतित जीव आहेत. त्यांना अधम मानले जाते, कारण ते जे भोजन करतात ते कुत्र्याच्या विष्ठेसमान असते. जो हे व्रत करीत नाही, त्याच्यासाठी यमदूत आहेतच, तो त्यांचा अंकित होतो, म्हणजे तो नरकवासी होतो.”

पंधरा दिवसा एक एकादशी ।

कां रे न करिसी व्रतसार ।।1।।

काय तुझा जीव जाते एका दिसे ।

फराळाच्या मिसे धणी घेसी ।।2।।

स्वहित कारण मानवेल जन ।

हरिकथा पूजन वैष्णवांचे ।।3।।

थोडे तुज घरी होती ऊजगरे ।

देऊळासी कां रे मरसी जाता ।।4।।

तुका म्हणे कां रे सकुमार झालासी।

काय जाब देती यमदूता ।।5।।

एकादशी व्रत सोमवार न करिती ।

कोण त्यांची गती होईल नेणो ।।6।।

काय करुं बहू वाटे तळमळ ।

आंधळी सकळ बहिर्मुख ।।7।।

हरिहरासी नाही बोटभरी वाती।

कोण त्यांची गती होईल नेणो ।।8।।

तुका म्हणे नाही नारायणी प्रिती ।

कोण त्यांची गती होईल नेणो ।।9।।

छत्रपती श्री शिवरायांना उपदेश करताना तुकाराम महाराज म्हणतात-

आम्ही तेणे सुखी। म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखि॥

तुमचे येर वित्त धन। जे मज मृतिके समान॥

कंठी मिरवा तुळशी। व्रत करा एकदशी॥

म्हणावा हरिचे दास। तुका म्हणे मज हे आस॥

” अहो, शिवराय, आपण मुखाने विठ्ठल विठ्ठल म्हणा म्हणजे आम्ही सुखी होऊ. आपली धनसंपत्ती आम्हाला मातीमोल वाटते. गळ्यात तुळशी माल घालून ते भूषण म्हणून लोकात मिरवा आणि एकादशी व्रताचे पालन करा. स्वतःला हरींचे दास म्हणवून घ्या, हीच माझी एकमेव इच्छा आहे.”

एकादशी हा हिंदु पंचांगाप्रमाणे प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या पक्षातला (पंधरवड्यातला) अकरावा दिवस आहे. हिंदू पंचांगाप्रमाणे महिन्यातला दोन पंधरवड्यांत(पक्षांत) प्रत्येकी एक अशा किमान दोन एकादश्या येतात.

कधीकधी एका पक्षात स्मार्त आणि भागवत अश्या दोन एकादश्या असतात. पक्षातल्या आधी येणाऱ्या स्मार्त एकादशीला नाव असते, भागवत एकादशीला

नसते. पण त्या पक्षात जर लागोपाठच्या दोन सूर्योदयांना दोन एकादश्या असतील तर दुसरीला नाव असते. दर महिन्यात येणाऱ्या एकादश्यांची नावे अशी (पहिले नाव शुक्लपक्षातल्या, तर दुसरे कृष्णपक्षातल्या एकादशीचे आहे). :

वैदिक मास /पालक देव /शुक्लपक्षातली एकादशी /कृष्ण पक्षातील एकादशी

चैत्र (मार्च–एप्रिल)/ विष्णु / कामदा एकादशी / वरूथला एकादशी

वैशाख (एप्रिल–मे) / मधुसूदन / मोहिनी एकादशी / अपरा एकादशी

ज्येष्ठ (मे–जून) / त्रिविक्रम / निर्जला एकादशी / योगिनी एकादशी

आषाढ (जून–जुलै) / वामन / शयनी एकादशी / कामदा एकादशी

श्रावण (जुलै-ऑगस्ट) / श्रीधर / पुत्रदा एकादशी / अजा एकादशी

भाद्रपद (ऑगस्ट–सप्टेंबर) / हृषीकेश / परिवर्तिनी एकादशी / इंदिरा एकादशी

आश्विन (सप्टेंबर–ऑक्टोबर) / पद्मनाभ / पाशांकुशा एकादशी / रमा एकादशी

कार्तिक (ऑक्टोबर–नोव्हेंबर) / दामोदर / प्रबोधिनी एकादशी / उत्पत्ती एकादशी

मार्गशीर्ष (नोव्हेंबर–डिसेंबर) / केशव / मोक्षदा

एकादशी / सफला एकादशी

पौष (डिसेंबर–जानेवारी) / नारायण /पुत्रदा एकादशी / षट्तिला एकादशी

माघ (जानेवारी–फेब्रुवारी) / माधव / जया एकादशी / विजया एकादशी

फाल्गुन (फेब्रुवारी–मार्च) / गोविंद / आमलकी एकादशी / पाप मोचन एकादशी

अधिक (३ वर्षांत एकदा) / पुरुषोत्तम / कमला एकादशी / कमला एकादशी

चैत्र - कामदा, वरूथिनी

वैशाख - मोहिनी, अपरा

ज्येष्ठ - निर्जला, योगिनी

आषाढ - शयनी, कामिका

श्रावण - पुत्रदा, अजा

भाद्रपद - परिवर्तिनी, इंदिरा

आश्विन - पाशांकुशा, रमा

कार्तिक - प्रबोधिनी, उत्पत्ती

मार्गशीर्ष - मोक्षदा, सफला

पौष - पुत्रदा, षट्तिला

माघ - जया, विजया

फाल्गुन - आमलकी, पापमोचनी

अधिक महिन्यातल्या दोनही एकादश्यांचे नाव 'कमला' असते.

एकादशीचे धार्मिक महत्त्व

आषाढ शुद्ध एकादशीला नुसते आषाढी आणि कार्तिक शुद्ध एकादशीला नुसते कार्तिकी असे म्हणायची रूढी आहे.

आषाढी एकादशी

आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजे आषाढ शुक्ल एकादशीला, शेषशायी भगवान श्री विष्णु झोपी जातात. ते कार्तिकी एकादशीपर्यंत झोपलेलेच असतात अशी समजूत आहे. म्हणूनच

चातुर्मासाचा आरंभ आषाढ शुक्ल ११ ला होतो व कार्तिक शुक्ल ११ ला चातुर्मास संपतो. धार्मिक वृत्तीची माणसे हे चार महिने व्रतस्थ राहतात. चातुर्मासातील चार महिन्यात अनेक व्रते पाळायची असतात ती पाळण्यासाठी सामर्थ्य प्राप्त व्हावे अशी प्रार्थना आषाढीच्या दिवशी करतात. चातुर्मासात जैन साधू गावोगावी न जाता एकाच देरासरात स्थानकवासी होतात.

आषाढ शुद्ध एकादशीच्या एक-दोन दिवस आधी येणाऱ्या नवमीला महाराष्ट्रात कांदे नवमी म्हणतात.

एकादशीची व्रते व उपवास

एकादशीला उपवास करण्याची प्रथा आहे. असा उपास करणाऱ्यांमध्ये दोन भेद आहेत. स्मार्त आणि भागवत. त्यासाठी दोन प्रकारच्या एकादश्या मानल्या जातात. भागवत धर्म पाळणारे, वारकरी इत्यादी लोक भागवत एकादशी, तर स्मृतींना मानणारे स्मार्त एकादशी पाळतात. एखाद्या महिन्यात दशमीचा, एकादशीचा वा द्वादशीचा क्षय असेल किंवा द्वादशीची वृद्धी असेल तर त्या महिन्यात बहुधा, स्मार्त आणि भागवत अश्या दोन एकादश्या दोन स्वतंत्र दिवशी येतात. दर महिन्याच्या प्रत्येक पक्षात अश्या दोन एकादश्या दोन वेगवेगळ्या दिवशी येतीलच असे नाही. पण जेव्हा एखाद्या पक्षात येतात तेव्हा, त्या एकादश्यांच्या निर्णयाचे नियम खाली क्रमवार दिले

आहेत.

१. एकादशीच्या सूर्योदयापूर्वीच्या ९६ मिनिटांत जर दशमी असेल, आणि, (अ) सूर्योदयापूर्वीच दशमी संपली तर दशमीचा, व (आ) सूर्योदयानंतर संपली तर एकादशीचा क्षय असतो. तेव्हा त्यापुढच्या द्वादशीच्या दिवशी भागवत आणि त्याच्या आधीच्या दिवशी

स्मार्त एकादशी आहे असे समजतात..

२. द्वादशीचा क्षय झाला असेल तर एकादशी व द्वादशीच्या युग्माच्या दिवशी भागवत आणि त्याच्या आधीच्या दिवशी स्मार्त एकादशी आहे असे मानले जाते.

३. द्वादश्या जर दोन असतील तर पहिल्या द्वादशीच्या दिवशी भागवत आणि त्याच्या पूर्वीच्या दिवशी स्मार्त एकादशी धरतात.

४. एकादश्या जर दोन असतील दोन्ही पक्ष दुसरी एकादशी धरतात.

५. वरील चार अपवाद वगळता, एरवी सूर्योदयाची जी एकादशी असेल ती स्मार्त आणि भागवत अशा दोन्ही

पक्षांची एकादशी समजतात.

६. पहिल्या दिवशी येणाऱ्या (स्मार्त) एकादशीला नाव असते, भागवत एकादशीला नसते. पण त्या पक्षात लागोपाठच्या दोन सूर्योदयांना दोन एकादश्या येत असतील तर दुसरीला नाव असते.

पौराणिक कथा

पौराणिक काळी मृदुमान्य नावाच्या राक्षसाला भगवान शंकराची आराधना करून

तुला कोणाकडूनही मृत्यू येणार नाही. फक्त एका स्त्रीच्या हातून मृत्यू येईल असा वर मिळतो. त्यामुळे उन्मत होऊन मृदुमान्य राक्षस देवांवर स्वारी करतो व त्याचा पराभव करतो. सर्व देव पराभूत होऊन एका गुहेत लपतात. त्याच वेळी

एकादशी देवतेचा जन्म होतो व ती मृदुमान्य राक्षसाचा नाश करून देवांची मुक्तता करते. त्यावेळी पाऊस

पडत असल्यामुळे सर्व देवांचे स्नान होते व गुहेत असल्यामुळे उपवासही घडतो. त्या दिवसापासून एकादशीचे व्रत उपवास म्हणून करण्याचा प्रघात पडला. हिंदूंच्या दृष्टीने हा एक अत्यंत पवित्र दिवस आहे.

स्मार्त व भागवत एकादशी

वर्षातून 24 एकादशींचा उपवास असतो. त्यामधे 4 ते 6 वेळा स्मार्त व भागवत अशा दोन एकादशी येत असतात. सूर्योदयानंतर १ मिनिटसुध्दा एकादशी नसताना म्हणजे संपूर्ण दिवस द्वादशी तिथि असताना व्दादशीचे दिवशी एकादशीचा उपवास कसा दिला जातो अशी शंका अनेकांच्या मनात येते.

सध्याच्या काळात स्मार्त / भागवत (वैष्णव) असे दोन प्रमुख संप्रदाय आहेत. एकादशीव्रत स्मार्तांसाठी पारणाप्रधान आहे आणि भागवतांना उपोषणप्रधान आहे. पारण्यास द्वादशी सूर्योदयास असलेल्या

दिवसाचे आधीचे दिवशी म्हणजे एकादशीचे दिवशी स्मार्तांनी उपोषण करावे. भागवतांना उपोषणाचे दिवशी दशमी वेध होता कामा नये. दशमी वेध होत असेल म्हणजे एकादशीच्या सूर्योदयापूर्वी अरुणोदयकाळी दशमी असेल तेव्हा दशमीविध्द एकादशीचा दिवस सोडून द्वादशीचे दिवशी भागवत संप्रदायांनी एकादशीव्रत करावे असे आहे हा मुख्य नियम आहे. अशा वेळेस त्रयोदशीचे दिवशी पारणे होईल. याचप्रमाणे एकादशीचा क्षय झाला तर दशमीचे दिवशी स्मार्त एकादशी आणि द्वादशीस भागवत एकादशी व्रत येते.

एकादशी तिथीचा निर्णय

भोजननिषेधात्मक व व्रतात्मक असे एकादशीच्या उपवासाचे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकाराला पुत्रवान गृहस्थांना कृष्णपक्षात देखील अधिकार आहे. व्रतात्मक उपवास मात्र अपत्ययुक्त गृहस्थांनी

कृष्णपक्षात करू नये, समंत्रक व्रतसंकल्प न करिता यथाशक्ति नियमयुक्त भोजनवर्जन मात्र करावे. याप्रमाणे तिथीचा क्षय असता शुक्लपक्षातही जाणावे. शयनी आणि बोधिनी यांच्या मध्यंतरीची कृष्णपक्षातली एकादशी करण्यास सापत्य गृहस्थादिक सर्वांना अधिकार आहे. विष्णूची सायुज्यमुक्ति व आयुष्य आणि पुत्र यांची इच्छा करणारे यांनी काम्यव्रत दोन्ही पक्षात करावे. काम्यव्रताला मुळीच निषेध नाही. वैष्णव गृहस्थाश्रमी यांनी कृष्णपक्षातल्या एकादशीला देखील नित्य उपवास करावा. हे एकादशीव्रत शैव, वैष्णव, सौर इत्यादि सर्वांना नित्य आहे. केले नाही तर दोष सांगितला आहे. संपत्ति आदि फल प्राप्त होते असे सांगितले आहे. यास्तव हे काम्यव्रत देखील आहे. काहींचे मत असे आहे की, मुहूर्तपरिमित दशमी असता दशमीत भोजन करावे, आणि सूर्योदयाच्या अगोदर आरंभ झालेली जी शुद्धधिकाधिक द्वादशिका तिचे ठिकाणी निरंतर दोन उपवास करावे; याप्रमाणेच तिथिपालनही करावे. परंतु हे मत योग्य नाही. आठ

वर्षानंतर ऐंशी वर्षापर्यंत एकादशी करण्याला अधिकार आहे. शक्ति असेल तर ऐंशी वर्षांच्या नंतर देखील करण्यास अधिकार आहे. सभूर्तृक स्त्रीने भर्त्याच्या अनुज्ञेवाचून अगर पित्रादिकांच्या अनुज्ञेवाचून उपवासव्रतादिकांचे आचरण केले तर व्रत निष्फळ होते, भर्त्याच्या आयुष्याचा क्षय होतो आणि नरक प्राप्त होतो. अशक्तांना नक्त, हविष्यान्न, अनौदन (भात न खाणे), फळ, तिळ, दूध, उदक, तूप, पंचगव्य, वायू ही एकाहून पुढचे श्रेष्ठ आहे. याप्रमाणे आपल्या शक्तीचे तारतम्य पाहून एका पक्षाचा स्वीकार करावा. एकादशीचा त्याग करू नये. द्वादशीला देखील केले नाही तर एकमध्य चांद्रायण (शुक्ल प्रतिपदेपासून दररोज एक घास वाढविणे, वद्य प्रतिपदेपासून कमी करून अमावास्येला उपोषण) प्रायश्चित्त करावे. नास्तिकपणामुळे न केल्यास पिपीलिकामध्य चांद्रायण (वरील प्रमाणेच) प्रायश्चित्त आहे. पति, पिता वगैरे अशक्त असल्यामुळे स्त्री, पुत्र, भगिनी, बंधु इत्यादिकांनी त्यांच्याकरिता एकादशी व्रताचे आचरण केले तर करणाराला शंभर यज्ञांचे पुण्य मिळते.

॥११॥

व्रतदिननिर्णय (वैष्णवांचा)

वैष्णव आणि स्मार्त असे एकादशीव्रताच्या अधिकार्यांचे दोन भेद आहेत. 'ज्याने वैष्णवी दीक्षा घेतली तो वैष्णव आणि ती न घेणारा तो स्मार्त होय,' अशी जरी मोठाल्या ग्रंथांतून व्याख्या केलेली आहे, तरी 'ज्याच्या त्याच्या कुलपरंपरेवरूनच वैष्णवत्व आणि स्मार्तत्व ही ठरतात, असे वृद्ध मानतात,' असे जे निर्णयसिंधूचे म्हणणे, तेच सर्वत्र शिष्टसंमत असे मानण्यात येते. अरुणोदयकाली दशमीवेध आणि सूर्योदयकाळी दशमीवेध असे दोन प्रकारचे वेध आहेत. सूर्योदयाच्या आधी चार घटका अरुणोदय समजावा. सूर्योदय स्पष्टच आहे. ५६ घटकांनंतर एक पळभरही जरी दशमीचा प्रयोग झाला असला, तरी तो अरुणोदयवेध वैष्णवांच्या संबंधाने घ्यावा. ६० घटकांनंतर एका पळाचाही जरी दशमीचा प्रवेश झाला

असला, तरी तो सूर्योदयवेध स्मार्तींबद्दल घ्यावा. ज्योतिषी लोकांच्या विवादामुळे जर वेधादिकांबद्दल संशय असेल, किंवा निरनिराळ्या मतांच्या वाक्यांच्या विरोधामुळे जर ब्राह्मणांमध्ये मतभेद असेल, तर एकादशी सोडून तिचा उपास द्वादशीला करावा. शुद्धा आणि विद्धा असे एकादशीचे दोन भेद आहेत. अरुणोदयाचा जी वेध करते ती विद्धा. ही वैष्णवांनी सोडून देऊन द्वादशीला उपास-करावा. जी अरुणोदयाचा वेध करीत नाही, ती शुद्धा. या शुद्धेचे जे चार भेद आहेत, ते येणेप्रमाणे -

१. एकादशी मात्राधिक्यवती. येथे आधिक्य म्हणजे दुसर्या दिवशी सूर्योदयानंतर तिथि असणे असा अर्थ समजावा. उदा. दशमी ५५ घटका, एकादशी ६० घ. १ प. द्वादशीचा क्षय ५८, ही एकादशीमात्राधिक्यवती शुद्धा झाली. अशा वेळी वैष्णवांनी दुसर्या दिवशी उपास करावा आणि स्मार्तांनी पहिल्या दिवशी करावा. दशमी ५५ घ., एकादशी ५८ घ. व द्वादशी ६० घ. १ प. द्वादशीचा क्षय ५८ घ. ही द्वादशी मात्राधिक्यवती शुद्धा झाली. अशा वेळी वैष्णवांनी द्वादशीला उपास करावा

आणि स्मार्तांनी एकादशीला करावा. दशमी ५५ घ. १ प., एकादशी ६० घ. १ प. आणि द्वादशी ५ घ. ही उभयाधिक्यवती शुद्धा झाली. अशा वेळी वैष्णव आणि स्मार्त या दोघांनी दुसर्या दिवशीच उपास करावा. दशमी ५५ घ., एकादशी ५७ घ. आणि द्वादशी ५८ घ. ही अनुभयाधिक्यवती शुद्धा होय. वैष्णव आणि स्मार्त या दोघांनी यातली पहिलीच उपासाला घ्यावी.

व्रतदिननिर्णय (स्मार्तांचा)

सूर्योदयी वेध असेल ती विद्धा आणि तशी नसेल ती शुद्धा. या प्रत्येकीचे आणखी जे भेद आहेत, ते येणेप्रमाणे

१. एकादशि मात्राधिक्यवती.

२. उभयाधिक्यवती

३. द्वादशी मात्राधिक्यवती आणि

४. अनुबयाधिक्यवती. असे एकंदर मिळून जे आठ प्रकार झाले. त्यांची उदाहरणे पुढीलप्रमाणे-

१. दशमी ५८ घ., एकादशी ६० घ. १ प. आणि द्वादशीचा क्षय; अशा एकादशीला मात्राधिक्यवती शुद्धा म्हणतात.

२. दशमी ४ घ., एकादशी २ घ. आणि द्वादशीचा क्षय अशी जी असते तिला मात्राधिक्यवती विद्धा एकादशी असे म्हणतात. या दोन्ही उदाहरणात, जे गृहस्थ स्मार्त असतील त्यांनी उपासाला पहिली घ्यावी आणि यति, निष्काम, गृहस्थ, वानप्रस्थाश्रमी, विधवा आणि वैष्णव यांनी उपासाला दुसरी घ्यावी. विष्णुच्या कृपेची इच्छा करणार्या स्मार्तांनी दोन्ही दिवशी उपास करावे असे काहींचे सांगणे आहे.

३. दशमी ५८ घ., एकादशी ६० घ. १ प. आणि द्वादशी ४ घ. ही जी, ती उभयाधिक्यवती होय.

४. दशमी २ घ., एकादशी ३ घ. आणि द्वादशी ६० घ. १ प. असल्यास ही द्वादशी मात्राधिक्यवती विद्धा असे समजावे. या दोन्ही उदाहरणात सर्व वैष्णव आणि स्मार्त यांनी शिल्लक असलेली दुसरीच एकादशी पाळावी.

५. दशमी ५८ घ. एकादशी ५९ घ. आणि द्वादशी ६० घ. १ पळ; ही द्वादशी मात्राधिक्यवती शुद्धा होय. ही शुद्धा असल्याने, स्मार्तांनी एकादशीलाच उपास करावा, द्वादशीला करू नये, असे माधवाचे मत आहे. या बाबतीत हेमाद्रि म्हणतो की, सर्वांनी दुसर्या दिवशी द्वादशीलाच उपास करावा. मोक्षाची इच्छा असलेल्या स्मार्तांनी दुसर्या दिवशी उपास करावा. असेही काहींचे मत आहे.

६. दशमी १ घ. एकादशी क्षयाला गेलेली ५८ घ. आणि द्वादशीची वृद्धि ५०घ. १प. ही एकादशी विद्धा झाली असल्यामुळे, स्मार्तांनी द्वादशीलाच उपास करावा. त्याप्रमाणेच उभयाधिक्य आणि द्वादशीमात्राधिक्य अशी जी विद्धा एकादशी, ती स्मार्तांनी पाळू नये व इतर सोडू नये. वैष्णवांनी सहाही प्रकारची आधिक्यवती सोडून द्वादशीलाच उपास करावा.

७. दशमी ५७ घ. एकादशी ५८ घ. आणि द्वादशी ५९ घ. ही अनुभयाधिक्यवती शुद्धा होय. या प्रसंगी सर्वांनी एकादशीलाच उपास करावा. द्वादशीला करू नये. ही

विद्धा असल्याने वैष्णवांनी द्वादशीलाच उपास करावा.

८. दशमी २ घ. एकादशीचा क्षय ५६ घ. आणि द्वादशी ५५ घ. असा जेव्हा प्रसंग असेल, तेव्हा देखील स्मार्तांनी एकादशीलाच उपास करावा आणि वैष्णवांनी द्वादशीला करावा. येथे उभयानाधिक्यवती विद्धा एकादशीच्या शेवटच्या भेदात पहिल्या दोन भेदाप्रमाणे-संन्यासी, मोक्षेच्छु आणि विधवा यांनी उपासाला दुसरीच घ्यावी. विष्णूची कृमा इच्छिणार्यांनी दोन्ही दिवशी उपास करावे असे योग्य युक्तिवादाने मला वाटते. सध्या सर्वत्र शिष्ट लोक हेमाद्रीचे मत आणि निष्कामत्वादिक यांचा अनादर करून, माधवाच्या मताप्रमाणेच त्यात तिळमात्रहि फरक न करता- स्मार्त निर्णय सांगतात. दोन उपास करावे. अथवा शुद्धाधिका द्वादशिकेला पुढल्या दिवशी उपास करावा असे कोणीही सांगत नाहीत. याप्रमाणे बहुतेक सर्वत्र माधवाचेच मत प्रचारात आहे असे समजावे. यावरून, वैष्णवांचे जे अठरा भेद आणि स्मार्तांचे जे अठरा भेद, त्यांचा निर्णय या उदाहरणांनी अर्थहीन ठरतो हे स्पष्टच झाले. या बाबतीत जास्त माहिती

पाहिजे असल्यास मोठाले ग्रंथ पाहावेत.

संक्षेपाने व्रतदिननिर्णय

एकादशीचे व्रत हे जयन्तीच्या व्रताप्रमाणे काम्य व नित्य आहे.यात अरुणोदयवेध आणि सूर्योदयवेध असे दोन प्रकारचे वेध आहेत. वैष्णव आणि स्मार्त यांचे दशमीचे दोन वेध अनुक्रमे सांगितले आहेत. वैष्णवांना विद्धा त्याज्य आहे आणि आधिक्यसंभवा असता शुद्धा देखील त्याज्यच होय. एकादशी अथवा द्वादशी जर अधिक असेल, तर आधीचा दिवस टाकून पुढचा दिवस घ्यावा, असा जो वैष्णवांचा निर्णय आहे, त्याचा अर्थ असा की, हे एकादशीव्रत केले नसता दोष सांगितला असल्याने, आणि याचे फल नित्य व संपत्ति वगैरे सांगितले आहे म्हणून, हे काम्य असे जे एकादशीचे व्रत; ते जयन्तीच्या व्रताप्रमाणे दोन्ही प्रकारचे आहे. एकादशीला दशमीचे जे एक अरुणोदयवेध आणि दुसरा सूर्योदय वेध असे दोन वेध

होतात, ते अनुक्रमे वैष्णव आणि स्मार्त यांचे असतात. यावरून अरुणोदयवेध तो वैष्णवांचा आणि सूर्योदयवेध तो स्मार्तांचा असे जाणावे. जो ५६ घटकांनी परिमित वेध असतो, तो अरुणोदय समजावा. सूर्योदय तर स्पष्टच आहे. वैष्णवत्व किंवा स्मार्तत्व या गोष्टी आपापल्या परंपरेलाच अनुसरून वृद्ध लोक मानतात, आणि म्हणूनच त्या ग्राह्य होत. वैष्णवाने अरुणोदयी वेध असलेली विद्धा एकादशी सोडावी आणि द्वादशीला उपास करावा. एकादशी व द्वादशी या दोहीचे जर आधिक्य असेल, आणि ते जर सूर्योदयानंतर असेल, तर शुद्धा देखील सोडून देऊन दुसर्या दिवशी उपास करावा. फक्त एकादशीचेच जर आधिक्य असेल, तर शुद्ध असलेला असा जो आधींचा दिवस तोही टाकून पुढचाच घ्यावा. त्याचप्रमाणे केवळ द्वादशीचेच जर आधिक्य असेल, तर पहिला दिवस सोडून द्यावा आणि दुसरा घ्यावा. हा वैष्णवनिर्णय झाला. आता स्मार्तनिर्णय सांगतो. 'एकादशी आणि द्वादशी या दोहींचीही जर वृद्धि असेल, तर स्मार्तांनी पहिल्या दिवसाचा त्याग करून, दुसरा दिवस घ्यावा.

केवळ एकादशीचीच जर वृद्धि असली, तर गृहस्थांनी पहिल्या दिवशी उपास करावा, आणि संन्याशांनी तो दुसर्या दिवशी करावा, असा गृहस्थ आणि यति यांच्या बाबतीत निर्णय आहे. द्वादशीचीच जर केवळ वृद्धि असेल, तर पहिली शुद्धा आणि दुसरी विद्धा अशी शुद्धा व विद्धा यांची व्यवस्था समजावी. असा हा स्मार्तनिर्णय आहे.' याचा अर्थ असा की, एकादशी व द्वादशी यांची जेव्हा वृद्धि असते, म्हणजे या तिथि जेव्हा सूर्योदयानंतर असतात, तेव्हा आधीच्या दिवसाची एकादशी जरी शुद्धा असते, तरी ती स्मार्तांनी पाळू नये; दुसर्या दिवशीच उपास करावा. जेव्हा फक्त एकादशीचीच वृद्धि असते, तेव्हा स्मार्त गृहस्थांनी पहिल्या दिवशी उपास करावा आणि संन्याशी वगैरेनी तो दुसर्या दिवशी करावा. फक्त द्वादशीच वृद्धि असेल, तर द्वादशीलाच उपास करावा. शुद्धा आणि विद्धा यांची अशी व्यवस्था आहे. याप्रमाणे दोन्ही तिथींचे आधिक्य असता आणि याचप्रमाणे केवळ द्वादशीचेच आधिक्य असताना मात्र स्मार्तांनी विद्धा एकादशीचा त्याग करावा; इतर वेळी

करू नये. याप्रमाणे येथे स्मार्तनिर्णय संपला.

वेधभेद

मध्यरात्रीनंतर जर दशमी असेल तर कपालवेध, ५२ घ, असेल तर छायावेध, ५३ घटका असेल तर ग्रस्तवेध, ५४ घ. असेल तर संपूर्ण वेध, ५५ घटका असेल तर सामान्य वेध, ५६ घ. असल्यास महावेध, ५७ घ. असल्यास प्रलयवेध , ५८ घ. असल्यास महाप्रलयवेध, ५९ घ. असल्यास अघोरवेध आणि ६० घ. असल्यास राक्षसवेध - असे वेधाचे दहा प्रकार नारदांनी सांगितले आहेत. मध्वाचार्यांच्या मताने चालणारे काही लोक यापैकी काही वेधांप्रमाणे चालतात.
माधवाचार्यादिकांना जो संमत असा एक ६५ घटकांचा तेवढाच वेध आहे. दशमी पंधरा घटकांनी एकादशीला दूषित करते, असे जे सांगितले, ते उपासावाचुनच्या व्रतासंबंधाने म्हणजे व्रताची अंगे जी संकल्प, पूजा वगैरे, त्यासंबंधाने होय. असे जरी आहे, तरी या

दोषामुळे तिचा सर्वथा त्याग न करिता, प्रातःकाली करायची जी संकल्प, अर्चन वगैरे कृत्ये, ती मध्याह्नानंतर करावीत, असे समजावे.

व्रतप्रयोग

उपासाच्या आदल्या दिवशी सकाळी नित्यकर्म करणे झाल्यावर

'दशमीदिनमारभ्य करिष्येऽहंव्रतं तव । त्रिदिनं देवदेवेश निर्विघ्नं कुरु केशव ।'

असा संकल्प करून मध्याह्नी एकदाच जेवावे. त्याचे नियम येणे प्रमाणेः - काश्याचे भांडे, मांस, मसूर, दिवसाची झोप, पोटभर जेवणे, पुष्कळ पाणी पिणे, दुसर्यांदा जेवणे, स्त्रीसंग, मध; खोटे बोलणे, हरभरे, कोद्र, भाजी, परान्न, सोडत, तेल, तीळ, मीठ, विडा वगैरे सर्व वर्ज्य करावीत. एकभुक्त झाल्यानंतर काटक्यांनी दात धुवावेत. रात्री जमिनीवर निजून

एकादशीला सकाळी पाने वगैरेंनी दात घासावेत. काटक्यांनी घासू नयेत. स्नानादिक रोजच्या क्रिया आटपल्यावर हाताच्या बोटात पवित्रके घालून उत्तरेकडे तोंड करावे व पाण्याने भरलेले भांडे हाती घेऊन

'एकादश्या निराहारो भूत्वाहमपरेऽहानि । भोक्ष्यामि पुण्डरीकाक्ष शरणं मे भवाच्युत' ॥

असा संकल्पाचा मंत्र म्हणून, विष्णूला पुष्पांजलि द्यावा. अशक्ताने 'जलाहारः । क्षीरभक्षः । फलाहारः । नक्तभोजी । ' यापैकी शक्त्यनुसार कोणचा तरी शब्द 'निराहारोच्या ऐवजी उच्चारून संकल्प करावा. शैवांनी रुद्रगायत्री संकल्प करावा आणि सौरांनी नेहमीच्या गायत्रीचा संकल्प करावा. सूर्योदयानंतर जरदशमी असेल, तर स्मार्तांनी हा संकल्प एकादशीच्या रात्री करावा. दशमी जर अर्धरात्रीनंतर असेल, तर सर्वांनी एकादशीला मध्याह्नानंतर करावा. संकल्पानंतर अष्टाक्षरमंत्राने तीन वेळा अभिमंत्रण करून, ते पाणी प्यावे. त्यानंतर, फुलांचा मंडप करून त्यात-फुले, गंध,

धूप, दीप, उत्तम नैवेद्य, अनेक प्रकारची उत्तम स्तोत्रे, गाणी, कर्णमधुर वाद्ये, साष्टांग नमस्कार, उत्तम प्रकारचे जयशब्द वगैरेनी विधिपूर्वक हरीची पूजा करून, रात्री जागरण करावे.

एकादशीनियम

एकादशीला पाखंडी लोकांशी संभाषण, स्पर्श किंवा दर्शन ही वर्ज्य करावीत; ब्रह्मचर्य राखून सत्य भाषण करावे दिवसा झोप घेऊ नये; वगैरे जे नियम, ते व्रतांच्या परिभाषेत सांगितले आहेत. एकादशीला पाखंडी, चांडाळ, विटाळशी वगैरेचे दर्शन झाले असता, सूर्यदर्शन घ्यावे म्हणजे शुद्धत्व येते. अशांचा स्पर्श झाला असता शहाण्याने स्नान करावे व नंतर सूर्यदर्शन घ्यावे म्हणजे तो शुद्ध होतो. अशांशी भाषण घडले तर अच्युताचे म्हणजे सूर्याचे चिंतन करावे. याप्रमाणे वरील गोष्टीबद्दल प्रायश्चित्त आहे. उपासाच्या दिवशी जर श्राद्धतिथि असेल तर श्राद्ध करून, उरलेले सर्व

अन्न एका ताटात वाढून, त्या सर्व अन्नाचा वास घ्यावा (अवघ्राण) आणि ते सर्व अन्न गाईसारख्या जनावरास खाऊ घालावे. कंद, यूळ, फळ वगैरे वस्तु खाऊन उपास करणार्यांने, स्वत: जी फळे वगैरे खावयाची ती, पितरांच्या जागी योजिलेल्या ब्राह्मणांच्या पानांवर वाढून, त्यातून शिल्लक राहिलेली खावीत. 'हे राजा, एकादशीला जर श्राद्धतिथि येईल, तर तो दिवस टाकून, द्वादशीला श्राद्ध करावे' वगैरे वचने वैष्णवांनी परंपरेच्या आचारानुसार पाळावीत. वैष्णवांना जर सोळा महालये करणे असेल, तर ती

एकादश्यधिकरणकं द्वादश्यधिकरणकंच महालयं तंत्रेण करिष्ये'

असा संकल्प करून द्वादशीला दोन महालये करावीत. काम्य उपासाच्या दिवशी सुतक आले असता शरीर संबंधाचे नियम स्वत: पाळून, सुतक संपल्यानंतर पूजा, दान, ब्राह्मणभोजन वगैरे योग्य कर्मे करावीत. नित्य अशा उपासाच्यादिवशी जर सूतक आले, तर स्नान करून हरीला नमस्कार करावा आणि निराहारादि

नियम स्वत: करून, पूजा वगैरे ब्राह्मणांकडून करवावीत. दानादिक करू नयेत. सुतक संपल्यानंतर ते काही एक करण्याची आवश्यकता नाही. विटाळशीपणा वगैरे दोष असता याचप्रमाणे करावे. द्वादशीला सकाळी नेहमीप्रमाणे पूजा करून, भगवंताला व्रताचे अर्पण करावे.

'अज्ञान तिमिरान्धस्य व्रतेनानेन केशव । प्रसीद सुमुखोनाथ ज्ञानदृष्टिप्रदो भव'

हा त्या व्रतार्पणाचा मंत्र होय. दशमी वगैरे दिवशी सांगितलेल्या व्रताचा जर भंग होईल, म्हणजे त्या दिवशी जर दिवसा झोप घेणे होईल, पुष्कळदा पाणि पिणे घडेल अथवा खोटे बोलणे घडेल, तर त्याच्या नियमभंगासाठी प्रत्येकाबद्दल नारायणाच्या अष्टाक्षर मंत्राचा १० वेळा जप करावा. दोष लहानसा घडला असेल तर २० वेळा तो जप करावा. व्रतामध्ये जर विटाळशी, चांडाळ, बाळंतीण वगैरेंचा शब्द ऐकू आला तर १००८ गायत्रीजप करावा आणि मग नैवेद्य आणि तुळशीची पाने यांनी मिश्र केलेल्या अन्नाचे पारणे

करावे. पारण्यात जर आवळा खाल्ला तर ज्याच्याशी भाषण केले असता दोष लागतो, तो दोष नाहीसा होतो. द्वादशी मोडली असता महादोष आहे; म्हणून द्वादशीलाच पारणे करावे. द्वादशी जर थोडी असेल, तर शिल्लक असलेल्या रात्रीत मध्यापर्यंतच्या सर्व क्रिया कराव्या. याला अपकर्ष म्हणतात कोणी असे म्हणतात की, अग्निहोत्र, होम वगैरेंचा अपकर्ष करू नये. (अपकर्ष म्हणजे मुळीच न करणे). याप्रमाणेच श्राद्धाचाही अपकर्ष नाही; कारण, रात्री श्राद्ध करण्याचा निषेध सांगितला आहे. मोठे संकट, श्राद्ध व प्रदोषादिव्रत असताना तीर्थ जल घेऊन पारणे करावे. द्वादशी जर बराच वेळ असेल, तर द्वादशीचा हरिवासर नावाचा पहिला पाद टाकून मग पारणे करावे. द्वादशी जर एक कलाही नसेल, तर त्रयोदशीला पारणे करावे. द्वादशी जर मध्याह्नानंतर असेल, तर सकाळी तीन मुहूर्तपर्यंतच पारणे करावे; ते माध्याह्नी वगैरे करू नये, असेच बहुतेकांचे मत आहे. निरनिराळ्या कर्माचे काल निरनिराळे आहेत. या नियमाला बाध येऊ नये म्हणून, पारणे अपराह्णीच करावे असेही कोणी म्हणतात. सर्व

महिन्यात जर शुद्ध व वद्य या दोन्ही पक्षांतील द्वादश्यांना श्रवणनक्षत्राचा योग येईल, तर ज्याच्या अंगी सामर्थ्य असेल त्याने एकादशी आणि द्वादशी या दोन्ही दिवशी उपास करावा. अशक्ताने एकादशीला फराळाचा गौणपक्ष धरून, श्रवणनक्षत्राच्या द्वादशीला उपास करावा. जर विष्णुशृंखल योग असेल, तर एकादशीच्याच दिवशी श्रवणद्वादशीचा उपास करून, श्रवणरहित अशा द्वादशीस पारणे करावे. द्वादशी जर श्रवणनक्षत्रापेक्षा कमी असेल, तर प्रणवयुक्त द्वादशीला देखील पारणे करावे; कारण द्वादशीचे उल्लंघन केले तर दोषे सांगितला आहे. विष्णु-शृंखल योगादिकांचा निर्णय, भाद्रपद महिन्यातल्या श्रवण द्वादशीच्या प्रकरणात सांगण्यात येईल. दिवसा झोप घेणे, परान्नभक्षण करणे, एकाहून अधिकवेळ जेवणे, स्त्रीसंग करणे, मध चाटणे, काश्याच्या भांड्यात जेवणे व तेलाचा उपयोग करणे, या आठ गोष्टी द्वादशीला वर्ज्य कराव्यात. द्यूत, संताप, हरभरे, कोद्रू, उडीद, तेल, मीठ, मसूर, काजळ, खोटे बोलने, लोभ श्रम, प्रवास, ओझे वाहणे, विद्या शिकणे, विडा खाणे वगैरे गोष्टी

वर्ज्य कराव्यात. हे नियम काम्यव्रतांत तर अवश्य पाळावेत. नित्य व्रतांतही सशक्ताने हे नियम पाळावेत. कठीण नियम पाळण्यास जर अंगी शक्ति नसली तर त्याने अहोरात्र भोजन वर्ज्य करून, इंद्रियनिग्रह करावा आणि श्रद्धेने विष्णूचे ध्यान करून, एकादशीचा उपास करावा, म्हणजे त्याचे पाप नाहीसे होते यांत संशय नाही. एकादशीला जो कोणी दुसर्यास जेव म्हणून सांगून स्वतः जेवतो तो नरकाला जातो. एकादशीव्रत केल्याने विष्णूची सायुज्यमुक्ति व संपत्ति, ही प्राप्त होतात. याप्रमाणे एकादशीव्रताचा निर्णय झाला. इतर कार्यात, द्वादशीयुक्त अशी जी एकादशी असेल, ती घ्यावी. येथे याप्रमाणे सतरावा उद्देश संपूर्ण झाला.

चैत्र शुद्ध एकादशी

चैत्र शुद्ध एकादशीला श्रीकृष्णाचा आंदोलनोत्सव करावा. कलिरुप पापाचा नाश करणार्या श्रीकृष्णाला जे झोंपाळ्यावर बसलेला पाहातात, ते हजारों

अपराधांतून मुक्त होतात. झोंके दिले तर कोटयवधी जन्मांतलीं पातकें नाहींशीं होतात. ते देवांना पूज्य होऊन वैकुंठांत विष्णूबरोबर क्रीडा करतात. वगैरे प्रकारचा आंदोलनाचा महिमा आहे.

विष्णुशयनोत्सव (आषाढी एकादशी)

आषाढ शुद्ध एकादशीला सर्वोपचारांनी युक्त अशा पलंगावर शंखचक्रादि आयुधांनी युक्त व लक्ष्मी पाय चुरीत बसली आहे अशी श्रीविष्णूची प्रतिमा ठेवून, तिची अनेक प्रकारच्या उपचारांनी पूजा करावी.

'सुप्ते त्वयि जगन्नाथे जगत्सुप्तं भवेदिदम् । विबुद्धे त्वथि बुध्यते तत्सर्वं सचराचरम् ॥

अशी तिची मग प्रार्थना करावी. त्या दिवशी उपास करून रात्री जागरण करावे. द्वादशीला पुन्हा पूजा करून, त्रयोदशीला- गायन, नर्तन, वाद्यवादन वगैरेंनी सेवा करावी. असे हे तीन दिवसांचे व्रत आहे. या

बाबतीत स्मार्त आणि वैष्णव यांनी आपापल्या एकादशीला शयनीव्रताचा आरंभ करावा. रात्री शयनोत्सव करावा व दिवसास प्रबोधोत्सव करावा. द्वाद्शीला पारण्याच्या दिवशी शयनोत्सव आणि प्रबाधोत्सव हे करावेत, असे कोणी म्हणतात. या बाबतीत देशाचाराप्रमाणे वागावे. हे व्रत अधिक महिन्यात करू नये. आषाढ शुद्ध द्वादशीला जेव्हा अनुराधानक्षत्र नसेल तेव्हा पारणे करावे. त्यातही अनुराधा नक्षत्राचा पहिला चरण मात्र वर्ज्य समजावा. ज्यावेळी द्वादशी थोडी असून वर्ज्य नक्षत्राचा भाग द्वादशीचा अतिक्रम करीत असेल त्यावेळी निषेधाचा त्याग करुन, द्वादशीलाच पारणे करावे असे कौस्तुभात सांगितले आहे. संगवकालाचा भाग टाकून, सकाळी अथवा मध्यान्हकाळी जेवण करावे असे पुरुषार्थ चिन्तामणीत सांगितले आहे.

विष्णुपरिवर्तनोत्सव

भाद्रपद शुक्ल एकादशीला अथवा द्वादशीला पारणे झाल्यावर विष्णूचा परिवर्तनोत्सव करावा. श्रवणाच्या मध्यभागी विष्णुचे परिवर्तन म्हणजे एका कुशीवरून दुसर्या कुशीवर वळणे होते. असे वचन आहे. यास्तव श्रवण नक्षत्राचे तीन भाग करून मध्यभागाचा योग जर एकादशीला येत असेल, तर एकादशीला व तसा योग जर द्वादशीस येत असेल तर द्वादशीला किंवा दोन्ही दिवशी जर श्रवणनक्षत्राचा अभाव असेल, तर द्वादशीलाच परिवर्तनोत्सव करावा, अशी या बाबतीतली व्यवस्था समजावी. सायंकाळी विष्णूची पूजा करून,

वासुदेव जगन्नाथ द्वादशीतव । पार्श्वेन परिवर्तत्व सुखं स्वपहि माधव॥'

या मंत्राने प्रार्थना करावी.

कामदा एकादशी कथा

एकदा धर्मराज युधिष्टिर ने भगवान श्रीकृष्णला प्रार्थना

केली की, 'हे महाराज! मला चैत्र शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीचे महत्व सांगा.' तेव्हा भगवान श्रीकृष्णाने सांगितले कि ,' हे राजा ! एकदा महर्षी वशिष्टी ने महाराज दिलीपला जी कथा सांगितली होती तीच मी आता तुम्हाला सांगतो.'

रत्नपूर नावाचा एक राज्य होते. तेथे एक श्रीमंत राजा पुंडरीक राज्य करत होता. रत्नपूर राज्यात अनेक अप्सरा, किन्नर आणि गंधर्व राहत होते. तेथे ललित आणि ललिता नावाचे पतीपत्नी राहत होते. त्या दोघामध्ये अत्यंत प्रेम होते. ते दोघे एकमेकांपासून दूर राहू शकत नव्हते.

एके दिवशी राजा पुंडरीकच्या सभेमध्ये सर्व गन्धर्वांसोबत ललित गाण गात होता. गाण गाता असतांना ललितला ललिताची आठवण आली त्यामुळे त्याचे सूर बिघडले. ललितच्या मनातल ओळखून कर्कोट नावाच्या नागाने गान बिघडल्याच कारण सांगितलं. तेव्हा पुंडरीकला क्रोध आला व तो बोलला की, ' तू माझ्या समोर गात असतांना तुझ्या स्त्रीच स्मरण करत आहे म्हणून तू कच्चे मांस आणि मनुष्य

खाणारा राक्षस बनशील आणि आपल्या कर्माचे फळ भोगशील.' राजा पुंडरीकच्या श्रापामुळे ललित त्याचवेळी राक्षस बनला. त्याचे मुख अत्यंत भयंकर नेत्र, सुर्यासारखे आणि तोंडातून अग्नी निघू लागला. डोक्याचे केस पर्वतावर असलेल्या वृक्षाप्रमाणे आणि हात खूप लांब झाले. तो राक्षस बनल्यावर अनेक कष्ट सहन करत वनामध्ये भटकू लागला. त्याची स्त्री दुखी होऊन त्याच्या मागे भटकू लागली. ती सदैव तिच्या पतीला या शापापासून मुक्ती मिळवण्याचा विचार करू लागली.

एक दिवस तिच्या पतीच्या मागे फिरत असतांना ती विंध्याचल पर्वतावर श्रुंगी ऋषीच्या आश्रमात पोहचली. श्रुंगी ऋषि ललिताला बघुन विचारले,' हे देवी! तु कोन आहेस आणि येथे कशासाठी आल आहेस ?' तीने सांगितले की,' हे मुनिवर ! माझ नाव ललिता आहे. माझा पती राजा पुंडरीक याच्या श्रापामुळे भयंकर आणि विशाल राक्षस बनला आहे. याच मला फार दुख आहे. माझ्या पतीच्या उद्धारासाठी काही उपाय सांगा.' ऋषिने सांगितले की ,' हे गंधर्व कन्या! आता चैत्र

शुक्ल एकादशी येणार आहे. जिच नाव कामदा एकादशी आहे. त्याच व्रत केल्यामुळे माणसाचे सगळे कार्य सिद्ध होतात. जर तू कामदा एकदशीचे व्रत करून त्याच पुण्य तू तुझ्या पतीला दिले तर राजापासून मिळालेल्या श्रापापासून त्याला मुक्ती भेटेल.'

चैत्र शुक्ल एकादशी आल्यावर ललीताने व्रत केले आणि द्वादशीला ब्राम्हणांच्या समोर आपल्या व्रताचे फळ आपल्या पतीला देऊन देवाला प्रार्थना केली की ,' हे प्रभू ! मी हे व्रत केले त्याचे फळ माझ्या पतीला भेटो त्यामुळे तो राक्षस योनीतून मुक्त होईल'. एकादशीचे फळ देताच तिचा पती त्याच्या मूळ रुपामध्ये परत आला. त्यानंतर ते एका दिव्य विमानावर बसून स्वर्गात निघून गेले.

श्रीकृष्णाने सांगीतले की, ' हे राजन! हे व्रत विधीपूर्वक केल्याने सगळया पापाचे नाश होते. तसेच राक्षस योनीतून आपण सुटून जातो. संसारात याच्या सारखे दुसरे व्रत नाही.'

समाप्त

कामदा एकादशी

कामदा एकादशीला चैत्र शुक्ल एकादशी असेही म्हणतात. चैत्र नवरात्र संपल्यानंतर शुक्ल पक्षात जी एकादशी येते तिला कामदा एकदशी म्हणतात. हे एकदाशीचे व्रत केल्यास आपले सगळ्या कामना पूर्ण होतात असे मानले जाते म्हणून या एकादशीला कामदा एकादशी असे म्हंटले जाते. या दिवशी भगवान श्रीकृष्ण ची पूजा केली जाते. आणि गरिबांना दान दिले जाते.

मोहिनी एकादशी कथा

युधिष्ठिराने विचारले, 'जनार्दना, वैशाख शुक्ल

पक्षातील एकादशीचे नाव काय? त्या एकादशीच्या व्रताचा विधी कोणता व त्या व्रताचे काय फळ मिळते ते मला सांग.' श्रीकृष्ण म्हणाले, 'धर्मराजा, पूर्वी रामाने वसिष्ठ ऋषींना हाच प्रश्न विचारला होता, त्यावेळी वसिष्ठ ऋषींनी रामाला जी कथा सांगितली तीच मी तुला सांगतो. ऐक तर.' रामचंद्र म्हणाला, 'हे भगवंता, सर्व व्रतात उत्तम व्रत कोणते आहे ? हे ऐकण्याची माझी इच्छा आहे. ते व्रत सर्व पापांचा क्षय करणारे व सर्व दु:खांचे निर्मूलन करणारे असावे. हे महामुनी, सीताविरहातून उत्पन्न झालेली अनेक दु:खे मी भोगली आहेत. त्या दु:खांच्या भीतीनेच मी तुला हे विचारीत आहे.' वसिष्ठ ऋषी म्हणाले, 'रामचंद्रा, तू चांगले विचारलेस. तुझी बुद्धी निष्ठावान आहे. रामचंद्रा, तूझ्या केवळ नामस्मरणानेही मनुष्य पवित्र होतो. तरीपण सर्व लोकांच्या हितासाठी पावन करणारे, सर्व व्रतात पवित्र आणि सर्वोत्तम असे व्रत मी तुला सांगतो. वैशाख महिन्याच्या शुद्ध पक्षातील एकादशीचे नाव मोहिनी एकादशी असे आहे. ही एकादशी सर्व पापांचा नाश करणारी आहे. या एकादशीच्या व्रतप्रभावाने

मनुष्य मोहजालातून आणि पातकांच्या समुदायातून मुक्त होतो. हे मी तुला अगदी खरे खरे सांगतो. म्हणून रामा, तुझ्यासारख्यांनी ही एकादशी अवश्य केली पाहिजे. रामचंद्रा, या एकादशीची कल्याणकारक व पुण्यप्रद कथा मी सांगतो ती ऐक. केवळ ही कथा ऐकल्यानेही महापातकांचा नाश होतो. सरस्वती नदीच्या रम्य किनार्यावर भद्रावती नावाची एक उत्तम नगरी होती. तेथे द्युतिमान नावाचा राजा राज्य करीत होता. तो चंद्रवंशात उत्पन्न झालेला असून धैर्यवान होता. तो युद्धही न्यायानेच करीत असे. त्याच नगरात धनपाल नावाचा वाणी राहत होता. तो धन-धान्यांनी समृद्ध होता. आणि पुण्यकर्मे करणारा होता. त्या वाण्याने पाणपोई, अन्नसत्रे, देवालये, धर्मशाळा, सरोवरे वगैरे बांधली होती. तो शांत स्वभावाचा असून विष्णुभक्तीत तत्पर होता. त्याला पाच पुत्र होते. सुमना, द्युतिमान, मेधावी, सकृती व धृष्टबुद्धी अशी त्यांची नावे होती. यांपैकी पाचवा धृष्टबुद्धी नित्य महापातके करण्यात मग्न असे. तो नेहमी वेश्येच्या संगतीत असे. विटाच्या गप्पागोष्टीत तो चतुर होता. द्यूत वगैरे

व्यसनात तो बुडालेला होता. व परस्त्रियांशी विलास करण्याची त्याला लालसा होती. त्याने देव, अतिथी, पितर, ब्राह्मण यांची कधीही सेवा केली नाही. तो नित्य अन्याय करीत असे. तो दुष्टबुद्धीचा होता व पित्याचे द्रव्य उधळणारा होता. तो पापी अभक्ष्यभक्षण करी आणि नित्य मद्यपानात मग्न असे. वेश्येच्या गळ्यात हात घालून डोळे फिरवीत तो भरचौकात उभा राही. यामुळे त्याला त्याच्या पित्याने घरातून बाहेर काढले. नातेवाइकांनीही त्याचा त्याग केला. स्वतःच्या देहाखेरीज त्याचे सर्व अलंकार नष्ट झाले. त्याच्याजवळचे द्रव्य संपल्यावर वेश्यांनी त्याचा त्याग केला व निंदा केली. त्यानंतर पुढे त्याच्या अंगावर वस्त्रही राहिले नाही. भुकेने तो व्याकुळ झाला. आता मी काय करू? कोठे जाऊ? कोणत्या उपायाने उपजीविका चालवू? अशी चिंता तो करू लागला. पुढे त्याने त्या नगरातच चोर्या करणे सुरू केले. तेव्हा त्याला राजपुरुषांनी पकडले. पण त्याच्या पित्याच्या कीर्तीमुळे सोडून दिले. नंतर पुन्हा पकडले व सोडले असे अनेकदा झाले. पण शेवटी राजसेवकांनी त्या

दुराचारी धृष्टबुद्धीला बळकट बेड्या घातल्या, चाबकाचे फटके पुन्हा पुन्हा मारले. शेवटी राजाने त्याला आज्ञा केली की, 'अरे मूर्खा, तू आता माझ्या राज्यात राहू नकोस ! असे सांगून राजाने त्याला कारागृहातून मुक्त करून हाकलून दिले. राजाच्या भीतीने तो गहनवनात निघून गेला. तेथे तो भुकेने व तहानेने व्याकुळ होऊन भक्ष्य मिळवण्यासाठी इकडे तिकडे धावू लागला. तेथे एखाद्या सिंहाप्रमाणे तो हरिण, डुक्कर व चितळ यांची शिकार करू लागला. मांसाहार मिळवण्याकरता पाठीवर भाता बांधून व धनुष्यावर बाण चढवून तो सर्व वनात फिरत असे तो अरण्यातील पशुपक्षी मारू लागला. चकोर, मयूर, कंक, तित्तिर वगैरे पक्षी व उंदीर यांची हत्या तो अरण्यात फिरून करीत असे. याप्रमाणे पूर्वजन्मी केलेल्या पापाचे फळ म्हणून तो तेथे दुःखरूपी चिखलात बुडून गेला. त्याचे मन नेहमी दुःखाने व शोकाने भरून गेलेले असे. रात्रंदिवस त्याला चिंता जाळीत असे. परंतु त्याचे पूर्वजन्मीचे थोडेसे पुण्य शिल्लक राहिले होते ! त्या पुण्यामुळेच की काय

एकदा तो कौंडिण्य ऋषींच्या आश्रमात येऊन पोचला. तेथे तपोधन कौंडिण्य ऋषी वैशाख मासानिमित्त भागीरथीत स्नान करून नुकतेच आले होते. शोकभावनेने भरून गेलेला धृष्टबुद्धी त्या ऋषीसमोर गेला. इतक्यात कौंडिण्याच्या अंगावरील स्नानाने भिजलेल्या वस्त्रामधून गंगाजलाचा एक बिंदू धृष्टबुद्धीच्या अंगावर पडला. त्या बिंदूचा स्पर्श होताच त्याची सर्व पातके नष्ट झाली व दुर्भाग्य संपले. धृष्टबुद्धी हात जोडून कौंडिण्य ऋषीसमोर उभा राहिला आणि म्हणाला, 'हे ब्राह्मणश्रेष्ठा, मी जन्मापासून पापच करीत आलो आहे ! द्रव्य खर्च केल्याशिवाय या पापाचे प्रायश्चित्त करता येत असल्यास मला सांगा. कारण सध्या माझ्याजवळ द्रव्य नाही.' ऋषी म्हणाला, 'तुझ्या पापाचा क्षय होण्यासाठी मी तुला गंगानदीत पिंडदान केल्याचे पुण्य व्रत सांगतो, ते एकाग्र चित्ताने ऐक. वैशाख महिन्याच्या शुद्ध पक्षात मोहिनी नावाची एकादशी आहे. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवून तू या एकादशीचे व्रत कर. या एकादशीला उपवास केल्यास ती एकादशी उपवास

करणाराची, अनेक जन्मात संपादन केलेली मेरूपर्वताएवढी पापेही नष्ट करते.' ऋषीचे हे बोलणे ऐकून धृष्टबुद्धी प्रसन्न झाला. रामचंद्रा त्याने कौंडिण्याच्या उपदेशाप्रमाणे विधिपूर्वक व्रत केले. व्रत केल्याबरोबर त्याची पापे संपली. त्याला दिव्य देह प्राप्त झाला आणि तो गरुडावर बसून जेथे कसलेच उपद्रव होत नाहीत, अशा वैकुंठ लोकाला गेला. रामचंद्रा, अज्ञान व दुःख नाहीसे करणारे असे हे मोहिनी एकादशीचे व्रत आहे. या त्रैलोक्यातील चराचर सृष्टीत या व्रताहून श्रेष्ठ असलेले दुसरे व्रत नाही. या व्रतापुढे यज्ञकर्म, दान किंवा तीर्थे यांचे पुण्य सोळावा हिस्सा सुद्धा भरत नाही. या एकादशीचे माहात्म्य वाचल्याने किंवा ऐकल्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते. ॥श्रीकूर्मपुराणातील मोहिनी एकादशीचे माहात्म्य संपूर्ण झाले॥

अपरा एकादशी [वैशाख व. एकादशी]

हे एकादशी व्रत करणार्यांने दशमी दिवशी जव , गहू, मूग आदी पदार्थ असलेले भोजन एकवेळ करावे. एकादशी दिवशी प्रात:स्नानादी नित्यकर्मे करून उपवास करावा व द्वादशी दिवशी पारणे करून जेवावे. या एकादशीचे ‘अपरा’ असे नाव आहे.

या व्रताच्या आचरणाने अपार पापे दूर होतात. जे चांगले वैद्य असूनही गरिबांना औषध देत नाहीत, दशग्रंथी विद्वान असूनही अनाथ मुलांना शिकवत नाहीत , चांगले शासक (राजा) असूनही प्रजेचा सांभाळ करीत नाहीत , बलवान असूनही दीनदुबळ्यांना संकटमुक्त करत नाहीत आणि श्रीमंत असूनही संकटग्रस्त कुंटुबांना मदत करीत नाहीत, ते नरकात जाण्यासच योग्य असतात. परंतु ‘अपरा’ एकादशीचे व्रत केले असता त्याच्या प्रभावाने ते देखील वैकुंठाला जातात.

कथा –

युधिष्ठिर म्हणाला, ‘जनार्दना, वैशाख कृष्ण पक्षात जी एकादशी येते तिचे नाव काय व माहात्म्य काय ? हे

ऐकण्याची मला इच्छा आहे. तेव्हा ते सर्व सांग.’

श्रीकृष्ण म्हणाली, ‘राजा तू लोकांचे कल्याण व्हावे म्हणून चांगला प्रश्न विचारला आहेस. या एकादशीचे नाव अपरा असून ती अपार फल देणारी आहे. राजा, ती खूप पुण्य देणारी असून महापातकांचाही नाश करते. जो या अपरा एकादशीचे व्रत करतो त्याला या जगात खूप कीर्ती लाभते. या अपरा एकादशीचे व्रत केल्यामुळे ब्रह्महत्येचे पाप केलेला, गोत्राचा नाश करणारा, गर्भहत्या करणारा, खोटे आरोप करणारा, परस्त्रीवर भाळणारा, अशा सर्वांची पापे निश्चितपणे नाहीशी होतात. खोटी साक्ष देणारे, खोटा तराजू वापरणारे, खोटी वजने वापरणारे, लबाडीने वेदाध्ययन करनारा, लबाडीने गणित करणारा ज्योतोषी, लबाडीने खोटी चिकित्सा करणारा वैद्य, हे सर्वजण खोटी साक्ष देणार्या इतकेच दोषी असतात आणि ते नरकात जातात. राजा, परंतु या लोकांना जर अपरा एकादशीचे व्रत केले तर त्यांची त्या त्या पापातून मुक्तता होते.

जो क्षत्रिय आपला क्षात्रधर्म सोडून युद्धातून पळ काढतो, तो आपल्या धर्मातून भ्रष्ट होऊन घोर नरकात पडतो. परंतु त्याने जर अपरा एकादशी केली तर तो त्या पापातून मुक्त होऊन स्वर्गाला जातो. जो शिष्य गुरूकडून विद्या मिळवल्यावर त्याची निंदा करतो त्याला महापातक लागते. आणि त्याला दारुण नरकवास प्राप्त होतो. परंतु त्याने अपरा एकादशीचे व्रत केल्यास त्या माणसाला सद्गती लाभते. तीन प्रकारच्या पुष्कर तीर्थात कार्तिक मासात स्नान केल्याने जे पुण्य मिळते, तेच पुण्य ही एकादशी केल्यामुळे मिळते.

तसेच माघ मासात मकर संक्रातीला प्रयाग क्षेत्रात स्नान केल्याचे पुण्य, काशी क्षेत्रात शिवरात्रीचा उपवास केल्याचे पुण्य, सर्व सुवर्ण दान दिल्यामुळे मिळणारे पुण्य, अशी सर्व गुरूग्रह, सिंह राशीत आला असता गोदावरीत स्नान केल्याचे पुण्य, कुंभ संक्रातीला बद्रिकेद्धारला दर्शन घेतल्याचे पुण्य, बद्रिनारायणाची यात्रा केल्याचे व तेथील तीर्थसेवनाचे पुण्य, अशी सर्व पुण्ये या एकाच अपरा एकादशीचे

व्रत केल्याने मिळत असतात.

कुरुक्षेत्रात सूर्यग्रहणाच्या वेळी स्नान केल्याने मिळणारे पुण्य हत्ती, घोडा, सोने दान दिल्याने मिळणारे पुण्य; यज्ञामध्ये आपले सर्व सुवर्ण दान दिल्यामुळे पुण्य, अशी सर्व पुण्ये या अपरा एकादशीच्या व्रताने मिळतात.

अर्धप्रसूत गाईचे दान देऊन किंवा सुवर्णदान देऊन किंवा पृथ्वी दान देऊन जे पुण्य मिळते तेच पुण्य या एकादशीच्या व्रतामुळे मिळते.

अपरा एकादशीचे हे व्रत म्हणजे पापरूपी वृक्षाचा छेद करणारी कुर्हाड आहे. पापरूपी इंधन जाळणारा, रानातला वणवा आहे. किंवा पापरूपी अंधकार नाहीसा करणारा सूर्य आहे किंवा पापरूप हरीण खाऊन टाकणारा सिंह आहे.

‘राजा, ज्याला पापाची भीती वाटत असेल, त्याने ही एकादशी करावी. जे लोक एकादशीव्रत करीत नाहीत, ते पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणे निरर्थक जन्माला येतात, किंवा लाकडाच्या बाहुलीप्रमाणे केवळ

मरणासाठीच जन्मलेले असतात.

अपरा एकादशीचे उपोषण करून जो मनुष्य त्रिविक्रम देवाची पूजा करतो. तो सर्व पापातून मुक्त होऊन विष्णुलोकाला जातो.

धर्मराजा, ही कथा लोकांच्या कल्याणाकरता मी तुला सांगितली आहे. ही कथा वाचली किंवा ऐकली तरीही सर्व पापातून मुक्तता होते.

॥ब्रह्मांडपुराणातील अपरा एकादशीचे माहात्म्य संपूर्ण झाले॥

॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥

निर्जला एकादशी कथा

भीमसेनाने विचारले,

'हे पितामह व्यासा, तुम्ही महाबुद्धिवंत आहात. मी काय म्हणतो ते ऐका.

युधिष्ठिर, कुंती, द्रौपदी, अर्जुन, नकुल, सहदेव हे

सर्वजण एकादशीला

कधीही भोजन करीत नाहीत. ते मला म्हणतात की,

‘हे वृकोदरा, तूही एकादशीला जेवू नकोस.’ आजोबा, मी त्यांना म्हणतो

की, मला भूक सहन होत नाही. ‘मी दाने देईन, केशवाची विधीपूर्वक पूजा

करीन. पण उपवास केल्याशिवाय एकादशी व्रताचे फळ कसे लाभेल ते

सांगावे.’

भीमसेनाचे हे बोलणे ऐकून व्यास म्हणाले,’भीमसेना, तुला नरक अनिष्ट वाटत असेल, व स्वर्गाची इच्छा असेल तर शुक्ल आणि वद्य पक्षातील एकादशांच्या दिवशी तू भोजन करू नकोस.’

भीमसेन म्हणाला,’आजोबा, तुम्ही तर महाबुद्धिवंत आहात. मी तुम्हालाखरे सांगतो की मला एकभुक्त राहणेही शक्य नाही.

मग माझ्याकडून उपवास कसा काय होणार?

माझ्या पोटात वृक नावाचा अग्नी नेहमी प्रज्वलित असतो. मी खूप अन्न खातो तेव्हा तो थोडा वेळ शमतो. मला वर्षातून एकच उपवास कसातरी करता येईल. तेव्हा मला नक्की करून सांगा की मी हा एकच उपवास कोणता करावा. ज्या एकाच उपवासाने मला सर्व एकादशींच्या उपवासाचे फळ मिळेल असा उपवास सांगा.’

व्यास म्हणाले,’भीमा, तू मनुष्यानेव् पाळायचे नियम ऐकले आहेस.वैदिक धर्म काय आहे, हेही तू ऐकले आहेस. पण हे राजश्रेष्ठा, हे धर्म कलियुगात आचरणे शक्य नाही. थोड्या उपायात, थोड्या खर्चात, व अगदी कमी श्रमाने महाफल देणारे सर्व पुराणांचे सार मी तुला सांगतो . ऐक.

शुक्ल व कृष्ण या दोन्ही एकादशांना भोजन करू नये. जो एकादशीला उपवास करतो, तो कधीही नरकाला जात नाही.’

व्यासांचे हे बोलणे ऐकून भीमसेन खूप घाबरला. आणि पिंपळाच्या पानासारखा थरथर कापू लागला.

तो म्हणाला, ‘आजोबा, मी उपवास करण्यास समर्थ नाही. म्हणून पुष्कळ फळ देणारे एकच एकादशी व्रत मला सांगा.’

व्यास म्हणाले, ‘ज्येष्ठ मासातील शुक्ल पक्षातील सूर्य वृषभ किंवा मिथुन राशीत असताना जी एकादशी येते, तिचा उपवास पाणीही न पिता प्रयत्नपूर्वक करावा. स्नान आणि आचमन या कामापुरताच पाण्याचा उपयोग करावा. तसे न केल्यास व्रतभंग होईल. हे व्रत करणार्याने एकादशीच्या सूर्योदयापासून द्वादशीच्या सूर्योदयापर्यंत पाणी वर्ज्य करावे. त्याने हा नियम पाळला तर त्याला प्रयत्न केल्याशिवाय बारा एकादशा केल्याचे फळ मिळते.

द्वादशीच्या दिवशी सकाळी स्वच्छ स्नान करावे, ब्राह्मणाला विधीपूर्वक जलदान किंवा सुवर्णदान द्यावे. नंतर आवश्यक कृत्ये करून आणि इंद्रिये व मन ताब्यात ठेवून ब्राह्मणांसह भोजन करावे.

भीमसेना, अशा प्रकारे व्रत केल्यामुळे कोणते पुण्य मिळते ते ऐक :

सर्व वर्षात ज्या एकादशा येतात त्या सर्व एकादशाचे फल ही एकादशी केल्यामुळे मिळते, यात संशय नाही. कारण तसे मला शंखचक्रगदाधारी केशवानेच सांगितले आहे. हे वृकोदरा, सर्व तीर्थांचे जे पुण्य, सर्व दानांचे जे पुण्य ते या एकादशीनेच मिळते. सर्व वर्षातील शुक्ल व वद्य पक्षातील ज्या धनधान्य देणार्या पुण्यकारक, पुत्र व आरोग्य वगैरे फळे देणार्या अशा सर्व एकादशांचे उपोषण केल्याचे एकत्र फळ या एकच एकादशीच्या उपवासाने मिळते. हे नरव्याघ्रा भीमा, मी तुला हे अगदी सत्य सांगत आहे. या एकादशीचे उपोषण करणार्याला त्याचे अंतःकाळी मोठ्या शरीराचे अक्राळ-विक्राळ, काळे, पिंगट दंड व पाश धारण करणारे भयंकर यम दृष्टीस पडत नाहीत. हे नरव्याघ्रा, याच्या उलट त्याच्या अंतःकाळी पीतांबर धारण करणारे, सौम्य, शंखचक्र धारण करणारे व मनोवेगाने जाणारे विष्णुदूत येतात आणि त्याला विष्णुलोकाला घेऊन जातात. म्हणून सर्व प्रयत्न करून या एकादशीचे व्रत पाणी न पिता करावे व गाईचे दान करावे. म्हणजे मनुष्य सर्व पापांतून मुक्त होतो.’

भीमानेही त्या दिवसापासून या कल्याणकारक एकादशीचे व्रत केले म्हणून तेव्हापासून ही

निर्जला एकादशी ‘पांडव एकादशी ‘ किंवा ’भीमसेनी एकादशी ‘ या नावाने सर्व लोकात प्रसिद्ध झाली.

हे पृथ्वीच्या राजा, भीमसेनाने ज्यावेळी निर्जला एकादशीचे व्रत सुरू केले, त्यावेळी तो भुकेने व तहानेने व्याकुळ झाला. त्याने दिवसाचे दोन प्रहर कसेतरी काढले तिसर्या प्रहरी भीमाला उपोषण व तहान सहन होईना तेव्हा तो गंगेत जाऊन पुष्कळ वेळ पडून राहिला. नंतर त्याने खूप वेळ स्नान केले. तेव्हा त्याला थोडीशी हुषारी वाटली. उपवासाची रात्र त्याने फार कष्टात काढली याप्रमाणे त्याने व्यासाने सांगितल्याप्रमाणे व्रत पाळले. या निर्जला एकादशीच्या भीमाने केलेल्या स्नानाचे स्मरण म्हणून दिवसाच्या तिसर्या प्रहरी पुन्हा एकदा स्नान करावे हे राजा तूही सर्व पापाचे शमन व्हावे म्हणून हा उपवास प्रयत्नपूर्वक कर. आणि भगवंताची आराधना कर.

एकादशीच्या दिवशी सकाळी शुद्ध होऊन पुढीलप्रमाणे संकल्प करावा.’ हे देवेशा. आज हरिदिन

आहे म्हणून मी पाणीही प्राशन न करता उपोषण करीन व दुसर्या दिवशी पारणे करीन.’ असा संकल्प करुन सर्व पापांच्या नाशासाठी इंद्रियांचे संयमन करून श्रद्धायुक्त अंतःकरणाने उपवास करावा. स्त्रियांचे किंवा पुरुषांचे पाप मेरू किंवा मंदार पर्वताएवढे जरी मोठे असले तरी या एकादशीच्या प्रभावाने भस्म होऊन जाते. हे राजा, ज्याला धेनू दान करण्याचे सामर्थ्य नसेल त्याने घटात सुवर्ण घालून आणि तो वस्त्राने गुंडाळून दान द्यावा.

या एकादशील पाणी न पिण्याचा जो नियम करतो तो मोठाच पुण्यवान होतो. कारण त्याला उपवासाच्या प्रत्येक प्रहरागणिक चार कोटी तोळे सोने दिल्याचे पुण्य मिळते. जो मनुष्य या एकादशीच्या दिवशी स्नान करुन दान, जप, होम वगैरे कर्मे करतो त्याचे पुण्य कधीही नष्ट होत नाही, असे श्रीकृष्णानेच सांगितले आहे. निर्जला एकादशीचेउपोषण भक्तीने केले असता वैष्णवपद प्राप्त होते. मग इतर नेम, नियम हवेतच कशाला? उपोषण करून जो मनुष्य या एकादशीच्या दिवशी सोने, अन्न व वस्त्र दान देतो, त्याला त्याचे फळ

अक्षय मिळते. या एकादशीच्या दिवशी जो अन्न जेवतो तो जणू पापच भक्षण करतो व त्याला शेवटी दुर्गती मिळते. जे एकादशीला उपवास करून द्वादशीला दाने देतात, ते अंती मोक्ष मिळवतात.

ब्रह्मघातकी, मद्यपान करणारे, चोर, गुरूचा द्वेष करणारे, नित्य खोटे बोलणारे असे सर्व पातकी या निर्जला एकादशीचे व्रत करतील तर ते सर्व पापातून मुक्त होतील. निर्जला एकादशीच्या दिवशी इंद्रिय-निग्रह करून श्रद्धायुक्त अंतःकरणाने स्त्री-पुरुषांनी आणखी काय करावे ते मी सांगतो, ऐक. त्या दिवशी जलाषयी नारायणाची पूजा करावी आणि धेनू दान द्यावी. किंवा त्याऐवजी तुपाचे दान द्यावे. मोठ्या दक्षिणा देऊन व मिष्टान्न देऊन ब्राह्मण संतुष्ट करावे. हे धर्मश्रेष्ठा राजा, ब्राह्मण संतुष्ट झाले म्हणजे त्यामुळे मोक्ष देणारा नारायण संतुष्ट होतोच.

जो हे निर्जला एकादशीचे व्रत करीत नाही, तो आत्मद्रोही असतो. तो पापी, दुराचारी व दुष्ट असतो, यात संशय नाही.

जे शांत, दानपर लोक जागरण करून हे उपोषण करतात, व त्या दिवशी वासुदेवाची पूजा करतात ते आपल्या शंभर पूर्वजांसह विष्णुलोकाला जातात.

या एकादशीचे पारणे करतना अन्न, पाणी, शय्या उत्तम आसन, कमंडलू व छत्र ही दाने द्यावीत. जो मनुष्य पारण्याच्या दिवशी सत्पात्र ब्राह्मणाला जोडा दान देतो, तो निश्चितपणे सुवर्णाचे विमानात बसून स्वर्गाला जातो. जे कोणी या एकादशीची कथा सांगतात किंवा भक्तिभावाने ऐकतात ते सर्व स्वर्गलोकाला जातात, याविषयी शंका नाही. कुरुक्षेत्रामध्ये सूर्यग्रहणात श्राद्धविधी केल्याने जे पुण्य मिळते, तेच पुण्य हे माहात्म्य ऐकल्याने मिळते.

॥श्रीभारतातील व पद्म पुराणातील निर्जला एकादशीचे माहात्म्य संपूर्ण झाले॥

॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥

त्वचारोग निवारणार्थ एकादशी व्रत : ‘योगिनी एकादशी’ : ज्येष्ठ व. एकादशी

ज्येष्ठ व. एकादशी दिवशी प्रात:स्नानादी नित्यकर्मे आचरुन

‘मम सकल पापक्षयपूर्वक कुष्ठादिरोगनिवृत्तिकामनया योगिन्येकादशीव्रतमहं करिष्ये ।’

असा संकल्प सोडून श्रिपुंडरीकाक्ष भगवंताचे (विष्णूचे) पूजन करावे. त्याच्या चरणोदकाने सर्वांगावर मार्जन करावे आणि उपवास करुन रात्री जागरण करावे, म्हणजे कुष्ठादी सर्व रोगांपासून मुक्त होतो.

कथा –

युधिष्ठिराने विचारले, ‘हे मधुसूदना, जेष्ठ वद्य पक्षातील एकादशीचे नाव काय? आणि तिचे माहात्म्य काय? हे मला कृपा करून सांग.’

श्रीकृष्ण म्हणाले, ‘राजा, सर्व पापांचा क्षय करणारे, ऐश्वर्य व मोक्ष देणारे व सर्व व्रतांत उत्तम असणारे व्रत तुला सांगतो. हे नृपश्रेष्ठा, जेष्ठ वद्य पक्षातील ही

‘योगिनी’ नावाची एकादशी महापातकाचा नाश करणारी आहे. ही सनातन एकादशी संसाररुपी सागरात बुडणार्यांना नौकेप्रमाणे वाटते. हे नराधीषा, ही योगिनी एकादशी त्रैलोक्यात सारभूत आहे. या एकादशीची पाप हरण करणारी प्राचीन कथा मी तुला सांगतो.

अलका नगरीचा राजा कुबेर शिवपूजक होता. त्याच्याकडे पूजेकरता फुले आणण्यासाठी हेममाली नावाचा माळी होता. त्या माळ्याला विशालाक्षी नावाची पत्नी होती. ती फार सुंदर होती. हेममाली तिच्या कामपाशत सापडून तिच्यावर फार प्रेम करीत होता.

तो एकदा नेहमीप्रमाणे शिवपूजेसाठी फुले आणायला गेला होता. त्याने नित्याप्रमाणे मानस-सरोवरातून फुले आणली, पण पत्नीचे मुख पाहून तो मोहीत झाला व फुले कुबेराच्या घरी न पोचवता पत्नीप्रेमात गुंतून घरीच राहिला.

इकडे कुबेर देवालयात बसून पूजा करीत होता.

माध्यान्ह काल होईपर्यंत तो फुलांची वाट पाहत बसून राहिला. हेममाली आपल्या घरी आपल्या प्रेयसीसह क्रीडा करीत राहिला.

यक्षराजा कुबेर फुले मिळण्यास उशीर झाल्यामुळे रागावला. तो आपल्या दूतांना म्हणाला, 'यक्षांनो, तो दुराधम हेममाली अजून का येत नाही. याचा तपास करा पाहू.'

कुबेर पुन्हा पुन्हा असे म्हणाला तेव्हा यक्ष म्हणाले, 'राजा, तो स्त्रीलंपट त्याच्या घरी स्वतःच्या पत्नीसह क्रीडा करीत आहे.'

हे ऐकताच कुबेर क्रोधाने जणू भरून गेला. त्याने तात्काळ हेममालीला बोलावून आणले. फुले पोचवायला उशीर झाला हे जाणून हेममाली घाबरला. त्याच्या नेत्रात भय दिसू लागले. तो कुबेरासमोर येऊन नमस्कार करून उभा राहिला.

त्याला पाहताच कुबेराला क्रोध आला व त्याचे नेत्र संतापाने लाल झाले. तो रागाने ओठ चावून म्हणाला, 'अरे पाप्या, दुष्टा, दुराचार्या तू देवाची अवहेलना

केलीस म्हणून तुझा व तुझ्या पत्नीचा वियोग होईल. तू श्वेतकुष्टी (पांढर्या कोडाचा) होशील व येथून भ्रष्ट होऊन वाईट जागी जाऊन पडशील !’

कुबेराचा हा शाप ऐकताच हेममालीच्या अंगात कोड भरले. आणि तो स्थानभ्रष्ट होऊन अरण्यात पडला. त्याला प्रचंड दु:ख झाले. त्या भीषण वनात त्याला अन्नपाणी मिळेना. त्याला दिवसा चैन पडेना व रात्री झोप येईना. त्याला कोड असल्याने सावलीत थंडी वाजे व उन्हात तर फार पीडा होत असे. पण त्याने केलेल्या शिवपूजेच्या प्रभावामुळे त्याची स्मृती मात्र कायम राहिली.

तो पातकांनी व्याप्त झाला होता तरी पूर्वकर्माचे स्मरण करीत भटकत राहिला. फिरता फिरता तो हिमालय पर्वतावर आला. तेथे त्याला श्रेष्ठ मुनी तपोनिधी मार्कंडेयांचे दर्शन झाले. त्या मार्कंडेयाला ब्रह्मदेवाचे सात दिवस म्हणजे सात कल्पे आयुष्य आहे.

तो पापी हेममाली मार्कंडेयाच्या आश्रमात गेला. तो आश्रम ब्रह्मदेवाच्या सभेसारखाच होता. त्याने त्या

ऋषीच्या चरणांना दुरूनच वंदन केले.

मार्कंडेय ऋषीने त्या कुष्ट्याला पाहिले. जवळ बोलावून ऋषीने त्याला विचारले, 'अरे, तुला असे कुष्ट कशामुळे झाले? तुझी अशी निंदास्पद स्थिती कशी झाली?'

त्यावर हेममाली म्हणाली, 'मी यक्षराजा कुबेराचा हेममाली नावाचा सेवक आहे. हे मुनी, मी कुबेराला रोज शिवपूजेच्या वेळी मानस-सरोवरातून फुले आणून देत असे. एके दिवशी मी कामासक्त होऊन स्त्रीसौख्यात रमल्यामुळे फुले द्यायला मला उशीर झाला. ऋषीश्रेष्ठा, त्यामुळे कुबेर रागावला व त्याने मला शाप दिला. त्या शापामुळेच माझा व पत्नीचा वियोग झाला. माझे शरीर कुष्टाने भरले. आणि मी अरण्यात जाऊन पडलो. आता पूर्व पुण्यामुळे मी तुमच्याजवळ येऊन पोचलो आहे. साधुपुरुषांच्या अंतःकरणाचा कल नेहमीच परोपकार करण्याकडे असतो, हे तुम्ही जाणताच. म्हणून हे मुनीश्रेष्ठा, मला अपराधाची शिक्षा करून या दुःखातून सोडवा.'

मार्कंडेय ऋषी म्हणाला, ‘तू माझ्यासमोर सत्य बोललास व अपराध लपवला नाहीस म्हणून मी तुला कल्याणकारक व्रताचा उपदेश करतो. जेष्ठ वद्य पक्षातील योगिनी एकादशीचे व्रत तू कर. त्या व्रताच्या पुण्यामुळे तुझे कुष्ठ निश्चितपणे जाईल.’

मुनीचे हे बोलणे ऐकून हेममालीला फार आनंद झाला. त्याने जमिनीवर आडवे होऊन मुनीला दंडवत घातला. मुनीने त्याला उठवले.

मार्कंडेयाच्या उपदेशाप्रमाणे त्याने योगिनी एकादशीचे व्रत केले. त्या व्रताच्या प्रभावाने त्याचे कुष्ट गेले व देवांप्रमाणे तो दिव्य देहाचा झाला. त्याचा व पत्नीचा संयोग झाला आणि त्याला उत्तम सौख्य प्राप्त झाले.

नृपश्रेष्ठा, योगिनी एकादशीचे व्रत हे असे आहे. अट्ठ्याऐंशी हजार ब्राह्मणांना भोजन घातल्याने जे फळ मिळते, तेच फळ योगिनी एकादशीचे व्रत केल्याने मिळते. ही एकादशी महापापाचे क्षालन करते व महापुण्याचे फल मिळवून देते हे माहात्म्य वाचल्याने किंवा ऐकल्याने हजार गायींचे दान दिल्याचे

पुण्य लाभते.

||याप्रमाणे ब्रह्मवैवर्त पुराणातील योगिनी एकादशीचे माहात्म्य संपूर्ण झाले||

शयनी एकादशी पौराणिक कथा

मांधाता नामक एका चक्रवर्ती सम्राटाची ब्रह्मांडपुराणातील कथा या संदर्भात सांगितली जाते. नारदाने विचारले, 'पित्या ब्रह्मदेवा, आषाढाच्या शुक्ल पक्षातील एकादशीचे नाव काय आहे? व तिचे माहात्म्य काय ते मला सांगा कारण मला विष्णूची आराधना करायची आहे?' ब्रह्मदेव म्हणाले, कलियुग आवडणार्या मुनिश्रेष्ठा, तू चांगले विचारलेस. तू खरोखरच वैष्णव आहेस. त्रैलोक्यामध्ये एकादशीसारखे दुसरे पवित्र व्रत नाही. हे व्रत पुण्यकारक असून ते पापांचा नाश करते, व सर्व इच्छा पूर्ण करते. ज्या माणसांनी जन्माला येऊन हे व्रत केले नाही, त्यांना खरोखरच नरकाची इच्छा आहे असे

समजावे. आषाढ महिन्यातील शुक्ल एकादशी पद्मा किंवा शयनी या नावाने प्रसिद्ध आहे. हृषिकेशाच्या प्रीतीकरता या एकादशीचे उत्तम व्रत जरूर करावे. आता मी तुला या एकादशीची पुराणातील कथा सांगतो. ही कथा ऐकल्यानेही महापापाचा नाश होतो. पूर्वी सूर्यवंशामध्ये मांधाता नावाचा राजा होता. तो चक्रवर्ती, सत्यप्रतिज्ञ व प्रतापी होता. तो आपल्या प्रजेचे पालन धर्माने व स्वतःच्या औरसपुत्राप्रमाणे करीत असे. त्याच्या राज्यात कधीही दुष्काळ पडत नसे व कोणालाही कसल्याच व्याधी नव्हत्या. त्या राजाच्या कोषागारात अन्यायाने मिळवलेले धन थोडेसुद्धा नव्हते. तो अशाप्रकारे राज्य करीत असताना पुष्कळ वर्षे लोटली. एकदा राजाच्या पूर्वजन्माच्या पापामुळे त्याच्या राज्यात तीन वर्षे पाऊस पडला नाही. त्यामुळे दुष्काळ पडून सर्व प्रजाजन त्रासले. व भुकेने आर्त झाले. राज्यात धान्य नसल्यामुळे देवयज्ञ, पितृयज्ञ, अग्निहोत्रे व वेदाध्ययन आदि व्यवहार बंद पडले. तेव्हा सर्व प्रजाजन राजाकडे आले आणि म्हणाले, 'राजा, प्रजेला हिताचे

ठरेल असे आमचे बोलणे ऐक. पुराणामध्ये पंडितांनी पाण्याला 'नारा' असे म्हटले आहे. तेथे पाण्यातच राहण्याचे भगवंतांचे घर-आयन-आहे म्हणून तर भगवंतांना नारायण असे म्हणतात. नारायण सर्वांच्या ह्रदयात राहतो. हा भगवान विष्णू पर्जन्यरूपच आहे. पर्जन्याची वृष्टी तोच करतो. त्यातूनच अन्न निर्माण होते व अन्नातूनच प्रजा निर्माण होते. 'हे राजा, असा हा पर्जन्य नसेल तर प्रजेचा नाश होतो. तेव्हा नृपश्रेष्ठा, ज्यामुळे पाऊस पडेल व आमचा योगक्षेम चालेल असे काहीतरी कर.' राजा म्हणाला, 'प्रजाजनांनो, तुम्ही सांगितलेत ते अगदी खरे आहे. अन्न हे ब्रह्मस्वरूपच आहे. सर्व चराचर जग अन्नामुळेच स्थिर आहे. सर्व भूतमात्र-प्राणिमात्र अन्नातूनच निर्माण होतात. जगाचे जीवन अन्नावरच चालते. पुराणात व लोकांच्या तोंडून मी असे ऐकले आहे की, राजांच्या अनाचारामुळे प्रजाजनांचे दुःख भोगावे लागते. मी सूक्ष्म बुद्धीने विचार करीत आहे. मी काही पाप केल्याचे मला आढळले नाही. तरीही प्रजाजनांचे हित व्हावे म्हणून मी सर्व प्रयत्न करीन.' राजाने असा विचार केला

आणि विधात्याला नमस्कार करून व बरोबर मोठे सैन्य घेऊन तो गहन वनात गेला. तेथे तप करणाऱ्या श्रेष्ठ मुनींच्या आश्रमांना त्याने भेटी दिल्या. त्यावेळी त्याला ब्रह्मदेवाचा मानसपुत्र असलेला अंगिर ऋषी दिसला. त्याच्या तेजाने दाही दिशा उजळल्या होत्या. तो जणू दुसरा ब्रह्मदेवच आहे की काय, असे वाटत होते. त्या ऋषीला पाहून मांधाता राजाला आनंद झाला व तो रथातून उतरून त्याच्यापुढे उभा राहिला. त्या ऋषीने राजाला आशीर्वाद देऊन त्याचे अभिनंदन केले व राज्यातील राजा, प्रधान, मित्र, भांडार, देश, किल्ले व सेना या राज्याच्या सात अंगांविषयी कुशल विचारले. राजाने स्वतःचे कुशल निवेदन करून ऋषीचे कुशल विचारले. नंतर ऋषीने राजाला इकडे वनात येण्याचे कारण विचारले. मुनीला ते कारण सांगताना राजा म्हणाला, 'मुनिश्रेष्ठा, मी स्वधर्माप्रमाणे पृथ्वीचे पालन करीत होतो. तरीही माझ्या राज्यात अनावृष्टी का व्हावी, याचे कारण मला समजत नाही. माझा संशय नाहीसा व्हावा म्हणून मी आपल्याशी आलो आहे. तरी प्रजाजनांचा योगक्षेम चालेल व त्यांचे

समाधान होईल असा उपाय सुचवावा. अंगिरा ऋषी म्हणाला, हे राजा, तू आषाढ शुक्ल पक्षातील पद्मा नावाच्या एकादशीचे व्रत कर. या व्रताच्या प्रभावाने तुझ्या राज्यात निश्चितपणे उत्तम वृष्टी होईल. ही एकादशी सर्व सिद्धी देणारी आहे व सर्व उपद्रवांचा नाश करणारी आहे. राजा, तू आपल्या परिवारासह व प्रजाजनांसह या एकादशीचे व्रत कर.' मुनीचे हे म्हणणे ऐकून राजा घरी परतला. आषाढ महिना आल्यावर त्याने पद्मा (म्हणजेच शयनी) एकादशीचे व्रत केले. ब्राह्मण, वैश्य, शूद्र या चारी वर्णांच्या प्रजाजनांनीही हे व्रत केले. राजा, त्या सर्वांनी असे व्रत करताच मेघांनी वर्षा सुरू केली. सर्व पृथ्वी जलाने भरून गेली. व थोड्या दिवसातच शेते पिकांनी शोभू लागली. हृषिकेशाच्या प्रसादाने सर्व लोकांना सौख्य लाभले. याकरिता पद्मा एकादशीचे हे उत्तम व्रत अवश्य करावे. हे व्रत ऐश्वर्य व मुक्ती देणारे व सर्वांना सुखदायक आहे. या एकादशीचे माहात्म्य वाचल्याने किंवा ऐकल्याने मनुष्य सर्व पापातून मुक्त होतो. याप्रमाणे ब्रह्मांडपुराणातील पद्मा एकादशीचे माहात्म्य संपूर्ण

झाले.

कामिका एकादशी

एका गावामध्ये एक वीर क्षात्रीत रहात होता. एका देवाशी काही कारणामुळे त्याचे एका ब्राह्मनासोबत भांडण झाले आणि त्यामध्ये त्या ब्राह्मणाचा मृत्यू झाला. आपल्या हातून मेलेल्या त्या ब्राह्मणाचा अंत्यविधी करण्याची इच्छा त्या क्षत्रियाने व्यक्त केली. परंतु इतर ब्राह्मणांनी त्याला परवानगी दिली नाही. ब्राह्मणांनी त्याला, तू ब्रह्म हत्येचा दोषी आहेस असे सांगितले. पहिले तू या पापाचे प्रायश्चित घे आणि पापातून मुक्त झाल्यानंतर आम्ही तुझ्या घरी भोजन करू.

यावर त्या क्षत्रियाने या पापातून मुक्त होण्याचा उपाय विचारला? तेव्हा ब्राह्मणांनी सांगितले की, आषाढ मासातील कृष्ण पक्षातील एकादशीला भक्तिभावाने श्रीविष्णूंचे पूजन आणि व्रत करून ब्राह्मणांना अन्नदान,

दक्षिणा देऊन आशीर्वाद प्राप्त केल्यानंतर तुला या पापातून मुक्ती मिळेल. ब्राह्मणांनी सांगितल्याप्रमाणे क्षत्रियाने एकादशीचे व्रत केले. त्या दिवशी रात्री भगवान विष्णूने क्षत्रियाला दर्शन देऊन, तुला ब्रह्म हत्येमधून मुक्ती मिळाली आहे असे सांगितले. अशाप्रकारे कामिका एकादशीचे व्रत केल्यामुळे क्षत्रियाला पापातून मुक्ती मिळाली.

पुत्रदा एकादशि

महाराज युधिष्ठिर यांनी विचारले,'हे परमेश्वरा! आपण एकादशीचे महात्म्य सांगून आमच्यावर मोठी कृपा केली आहे. आता आम्ही आपल्याला विनंती करतो की, पौष शुक्ल एकादशीचे व्रत कशासाठी केले जाते, त्याचा विधी काय व व्रतात कोणत्या देवाची पूजा केली जाते.'

भक्तवत्सल परमेश्वर श्रीकृष्ण म्हणाले, 'हे राजन! या एकादशीचे नाव पुत्रदा एकादशी होय. या दिनी विष्णू

नारायणाची पूजा केली जाते. या संपूर्ण संसारात पुत्रदा एकादशीच्या व्रतापेक्षा श्रेष्ठ असे एकही व्रत नाही. व्रताच्या पुण्याने मानव तपस्वी, विद्वान व धनवान होतो. यासंदर्भात एक कथा सांगतो ती लक्षपूर्वक ऐका.'

भद्रावती नावाच्या नगरीत सुकेतुमान नामक राजा राज्य करत असे. त्याला संतान नव्हते. त्याच्या पत्नीचे नाव शैव्या होते. ती निपुत्रिक असल्याने नेहमी दु:खी असायची. राजाकडे धन-संपत्ती, हत्ती, घोडे, मंत्री-संत्री सगळे होते, मात्र राजाला कुठल्याच गोष्टीत समाधान मिळत नव्हते.

मी मेल्यानंतर मला कोण पिंडदान करेल, याच विचारात राजा असायचा. मुलगा नसल्याचे आपण पुर्वज व देवाचे ऋण कसे चुकवू या विचारांनी राजाच्या मनात घर केले होते. ज्या घरात कुलदीपक नसेल त्या घरात नेहमी अंधार असतो, अशी राजाची समजूत झाली होती. कुलदीपकासाठी काही ना काही प्रयत्न केले पाहिजे असे,राजाला सारखे वाटायचे.

ज्या व्यक्तीने पुत्रमुख पाहिले आहे, तो धन्य आहे. अशा व्यक्तीला पृथ्वीलोकात यश व परलोकात शांती लाभत असते. पुर्वजन्माच्या पुण्याईने व्यक्तीला पुत्र, धनप्राप्ती होत असते. राजा अशा विचारात रात्रंदिवस गर् कअसायचा.

एकदा राजाने आत्मदहन करण्याचा निश्चय केला. मात्र, आत्महत्या करणे हे सगळ्यात मोठे पाप असल्याने त्याने निर्णय रद्द केला. एके दिवशी राजा घोड्यावर बसून जंगलात निघून गेला व तेथील झाडा-फुलाना न्याहाळू लागला. जंगलात त्यावेळी मोर, वाघ, सिंह, माकड, साप आदी मुक्तसंचार करत होते. हत्ती त्याच्या पिल्लासह फिरत होता. राजाला जंगलात येऊन बराच कालावाधी होऊन देखील घरी परत जाण्याचे नाव घेत नव्हता. जंगलातील दृश्य पाहून तो विचार करत होता- 'मी आजपर्यंत यज्ञ केले, ब्राम्हण देवताला भोजन करून तृप्त केले तरी ही माझ्या वाट्याला दु:खच का आले असावे?'

विचारात मग्न असलेल्या राजाला पाण्याची तहान

लागली. राजा इकडे-तिकडे पाण्याचा शोध घेऊ लागला. थोड्याच अंतरावर राजाला एक एक सरोवर दिसले. त्या सरोवरात सुंदर कमळ उमलले होते. हंस व मगर विहार करत होते. सरोवराच्या चहुबाजुंनी ऋषींचा आश्रम होता. त्याच वेळी राजाचा उजवा डोळा फडफडायला लागला. राजाला शुभशकुन प्राप्त होणार असल्याची जाणीव झाल्याने तो घोड्यावरून उतरून ऋषीमुनींना नतमस्तक होऊन त्यांच्यासमोर विराजमान झाला.

राजा पहातच एका ऋषीचे म्हटले - 'हे राजन! आम्ही आपल्यावर अत्यंत प्रसन्न झालो आहोत. आपल्या मनात असेल ते वर मागा.'हे एकताच राजा त्यांना विचारले, 'महाराज आपण कोण आहात, येथे येण्याचे प्रयोजन काय?'

राजाच्या प्रश्नाला उत्तर देताना ऋषीने सांगितले, हे राजन! आज संतान देणारी पुत्रदा एकादशी आहे. आम्ही विश्वदेव असून आम्ही या सरोवरात स्नान करण्यास आले आहेत.

हे ऐकून राजाने म्हटले,'ऋषीदेवता मला संतान नाही, माझ्यावर कृपा करा, मला पुत्रप्राप्तीचे वरदान द्या.'

ऋषीमुनी म्हणाले -'हे राजन! आज पुत्रदा एकादशी आहे. हे व्रत आपण अवश्य करावे. परमेश्वर कृपेने आपल्या घरात लवकरच पाळणा हलेल.

ऋषीमुनींचे वाक्य ऐकून राजाने त्या दिवशी एकादशीचे व्रत केले व द्वादशीला या व्रताचे उद्यापन केले. ऋषीमुनींना दंडवत करून राजा महलात परतला. काही दिवसातच राणीला दिवस गेले. नऊ महिन्यानंतर राजाच्या घरी मुलाने जन्म घेतला. राजाला कुलदीपक मिळाला. राजाचा पुत्र अत्यंत शूरवीर,यशस्वी व प्रजापालक होता.

तात्पर्य हेच की, पुत्र प्राप्तीसाठी पुत्रदा एकादशीचे व्रत केले पाहिजे. जो व्यक्ती या व्रताचे माहात्म्याचे पठण किंवा श्रवण करतो त्याला मृत्युपश्चात स्वर्गात जागा मिळते.

इंदिरा एकादशी

प्राचीन काळी सत्ययुगात महिष्मतीपुरीचा इंद्रसेन नावाचा प्रतापी राजा धर्माचरणाने प्रजेचे पालन करत होता. इंद्रसेन राजा पुत्र, पुत्री, नातवंडे, धन, संपत्तीने संपन्न आणि भगवान विष्णूचा परम भक्त होता. एके दिवशी राजा राजदरबारात निवांत बसला असताना अचानक देवर्षी नारद आकाश मार्गाने तेथे आले. त्यांना पाहताच राजाने उठून त्यांचे स्वागत केले आणि यथासांग पूजा केली.

त्यानंतर इंद्रसेन राजाने देवर्षीला आगमनाचे कारण विचारले...

तेव्हा नारदमुनी म्हणाले की, हे राजन माझे बोलणे तुला चकित करणारे आहे. एकदा मी ब्रह्मलोकातून यमलोकात गेलो होतो. तेथे यमदेवाने माझी भक्तिभावाने पूजा केली. त्यावेळी यमराजाच्या सभेत मी तुमच्या वडिलांना पाहिले. ते एकादशी व्रतभंगाच्या दोषामुळे तेथे आले होते. राजन, त्यांनी तुमच्यासाठी एक निरोप दिला आहे. त्यांनी सांगितले आहे की, पूर्ण

जन्मात एकादशी व्रतामध्ये काही कारणास्तव विघ्न आल्यामुळे मी यमलोकात आलो आहे. यामुळे मुला, माझ्या निमित्ताने तू इंदिरा एकादशीचे व्रत केल्यास मला स्वर्ग प्राप्ती होऊ शकते.

नारदमुनींचे म्हणणे ऐकल्यानंतर राजाने कुटुंबीयांसहित हे व्रत केले. व्रताच्या पुण्य प्रभावाने राजाचे वडील गरुडावर बसून वैकुंठात गेले. त्यानंतर राजा इंद्रसेनही एकादशीच्या व्रत प्रभावाने निष्कंटक राज्य चालवून शेवटी मुलाला सिंहासनावर बसवून स्वर्गलोकात गेला.

पाशांकुशा एकादशी

हिंदू पंचांगानुसार अश्विन मासातील शुक्ल पक्षातील एकादशीला पाशांकुशा एकादशी म्हणतात.या एकादशीच्या दिवशी मनोवांच्छित फळ प्राप्तीसाठी भगवान विष्णूची पूजा केली जाते.धर्म ग्रंथानुसार सर्व पापांचा नाश करणारी,स्वर्ग व मोक्ष प्रदान करणारी

आणि आरोग्य,सुंदर स्त्री,धन व मित्र देणारी ही एकादशी आहे.येथ जाणून घ्या या व्रताचा विधी...

या व्रताचे पालन दशमी पासूनच करावे.दशमी तिथीला सात धान्य म्हणजे गहू,उडीद,मुग,हरभरे,जवस,तांदूळ आणि मसूरच्या डाळीचे सेवन करू नये,कारण या सातही धान्याची एकादशीच्या दिवशी पूजा केली जाते.जेवढे शक्य असेल तेवढे दशमी आणि एकादशीच्या दिवशी कमीत कमी बोलावे.दशमी तिथीला जेवणात तामसिक वस्तूंचे सेवन करू नये आणि पूर्ण ब्रह्मचर्यचे पालन करावे.

एकादशी तिथीला सकाळी उठून नं केल्यानंतर संकल्प करावा.संकल्प आपल्या शक्तीनुसार घ्यावा,म्हणजे दिवसातून एकदाच फलाहार किंवा आहार न घेण्याचा.संकल्प केल्यानंतर चौरंगावर किंवा पाटावर श्रीविष्णूच्या मूर्तींची किंवा प्रतिमेची स्थापन करून पूजा करावी.व्रत करणाऱ्या व्यक्तीने विष्णू सहस्त्रनामाचे पाठ करावेत.या व्रताचे समापन एकादशीला होत नाही तर द्वादशीला सकाळी ब्राह्मणाला अन्नदान आणि दक्षिणा दिल्यांनतर हे व्रत

समाप्त होते.

प्राचीन काळी विंध्य पर्वतावर क्रोधन नावाचा एक शिकारी राहत होता. तो खूप क्रूर होता. त्याचे संपूर्ण आयुष्य पाप कर्मात गेले. जेव्हा त्याचा अंत जवळ आला तेव्हा तो मृत्युच्या भीतीने महर्षी अंगिराच्या आश्रमात पोहचला. अंगिरा ऋषीला त्याने सांगितले की, ऋषिवर 'मी आयुष्यभर पाप कर्म केले आहेत, कृपा करून मला एखादा असा उपाय सांगा ज्यामुळे माझ्या पापांचा अंत होईल आणि मला मोक्ष मिळेल.' त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून अंगिरा ऋषींनी त्याला पाशांकुशा एकादशीचे व्रत सांगितले. महर्षी अंगिराने सांगितलेल्या विधीनुसार त्या शिकाऱ्याने एकादशाचे व्रत केले आणि सर्व पापातून मुक्त झाला.

रमा एकादशी

आश्विन कृष्ण एकादशी ही दीपोत्सवाचा पहिला दिवस. त्याने नावच रामा एकादशी. रमा शब्दाचा अर्थ

आहे लक्ष्मी. देव-दानवांच्या समुद्रमंथनातून 14 रत्ने लाभली. त्यातील पहिलेच नाव आहे लक्ष्मी. (आणि 14वे रत्न अमृत) तिच्या नावे एकादशी म्हणून ही रमा एकादशी. दीपलक्ष्मीच्या पूजा प्रार्थनेनेच दीपावली सप्ताहाचा शुभारंभ होतो. प्रात: काळी दीपज्योती उजळून दीपलक्ष्मीची प्रार्थना करून शत्रुत्वाच्या नाशाच्या प्रार्थनेने दिवाळीचा श्रीगणेशा करायचा.

प्रबोधिनी एकादशी

कार्तिक शुद्ध एकादशी ही एकादशी मोठी एकादशी म्हणून देखील ओळखली जाते. चातुर्मासाचा आरंभ आषाढ शुक्ल 11 ला होतो व कार्तिक शुक्ल 11 म्हणजेच कार्तिकी एकादशीला चातुर्मास संपतो. आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजे आषाढ शुक्ल एकादशीला, शेषशायी भगवान श्री विष्णू झोपी जातात म्हणूनच आषाढी एकादशीला "शयनी एकादशी" असे देखील म्हणतात. आषाढी एकादशी ते

कार्तिकी एकादशी पर्यंत झोपलेलेच असतात अशी समजूत आहे.

शास्त्रांप्रमाणे एकादशी व्रत केल्याने व या दिवशी कथा श्रवण केल्याने स्वर्गाची प्राप्ती होते. या दिवशी पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन करावे.

क्षीरसागरात शयन करत असलेले श्री विष्णूंना उठवून मंगळ कार्य आरंभ करण्याची प्रार्थना केली जाते.

मंदिर आणि घरामध्ये उसांचे मंडप तयार करून सत्यनारायणाची पूजा केली जाते आणि त्यांना बोर, आवळ्यासह इतर मोसमी फळांचा नैवेद्य दाखवला जातो.

मंडपात शालिग्राम आणि तुळशीचा विवाह सोहळा आयोजित केला जातो.

मंडपाची प्रदक्षिणा घालून अविवाहित लोकांच्या विवाहासाठी प्रार्थना केली जाते.

या एकादशीला शालिग्राम, तुळस आणि शंख यांचे पूजन केल्याने पुण्य प्राप्त होतं.

एकादशीला दिवे प्रज्वलित केले जातात आणि फटाके फोडून आनंद साजरा करतात.

उत्पत्ति एकादशी

उत्पत्ति एकादशी ची कथा हि देवी एकादशीच्या जन्माची अर्थात उत्पत्तिचीच गोष्ट आहे. याच कारणामुळे उत्पत्ति एकादशी चे व्रत करणाऱ्यास त्याने केलेल्या उपासनेच्या शुद्धीच्या व समर्पणयुक्त भावनेच्या प्रमाणात शत्रूवर विजय मिळवण्यास सहाय्यभूत होते. . सत्ययुगात दानव कुळामध्ये तालजंघ नावाचा राक्षस राहात होता. जोअति भयंकर व पराक्रमी होता. त्याचा पुत्र मुर हा त्याच्याहून पराक्रमी व भयंकर होता. त्याने साव्रगाव्र स्वारीकरून सर्व देवतांना पराभूत करून तिथून हाकलून लावले. कितीही युद्ध केले तरी मुरला हरवणे देवराज इंद्राला शक्य झाले नाही. . मुर इतकेच करून थांबला नाही तर चांदवती नावाच्या नगरीमध्ये निवास करत

असणाऱ्या या दैत्याने स्वर्गात दुसऱ्याच दैत्याला इंद्रपदी बसवले. इतकेच नव्हे तर अग्नि, चन्द्रमा, सूर्य, वायु तथा वरुण हे सुद्धा दुसरेच बनवले आहेत. इंद्राला पराजित करणे इथपर्यंत ठीक पण या पुढे जाऊन या दैवी योजनेत फेरफार करण्याचा अधिकार कुणालाच नव्हता. हिबाब इंद्राने श्रीमहादेवांच्या कानी घातली. त्यावर महादेवांनी इंद्राला श्री विष्णूंना हे सांगण्याचा सल्ला दिला. . भगवान श्रीविष्णूंना इंद्राने हे सांगितल्यावर दैवी योजनेत फेरफार केल्याचा श्रीविष्णूंना खूप राग आला. त्यांनी गरुडावरून चांदवती नगरीवर स्वारी करून मुरदैत्याला शरण येण्यास सांगितले. चतुर्भुजभगवंताला आपण जिंकू शकणार नाही हे ओळखून मुर दैत्याने त्याच्या प्रचंड सेनेला प्रतिकारार्थ पाठवले. भगवान विष्णूंनी त्या दैत्यांचा पराभव केला . सूर्यास्ताला युद्ध थांबल्यावर श्रीविष्णू बदरिकाश्रमात विश्रामा करिता गेले . तेथे जवळच असलेल्या बारा योजने लांब असलेल्या सिंहावती नावाच्या गुहेत श्रीविष्णू रात्री विश्रामार्थ झोपले. .

मुर राक्षस लपून छपून श्रीविष्णूंचा झोपेतच घात करण्याकरिता गुहेत प्रवेशला. अश्यावेळी भगवंतांच्या नेणीवेतून एक अतिशय रूपवान , सौभाग्य शालिनी व दिव्या अस्त्रांनी युक्त अशी कन्या प्रकट झाली. तिने मुरला युद्धासाठी आव्हान दिले. एकस्त्रीआपला काय पराभव करणार ? या गर्वाने मुरने आक्रमण केले. एकादशी आणि मुर दोघेही युद्धात निपुण होते . त्या युद्धात एकादशी ने मुरला ठार केले.

निद्रेतून जागे झाल्यानंतर भगवंतांनी त्या भयंकर राक्षसाला कुणी मारले असा प्रश्न केला. तेव्हा एकादशीने त्यांना सारा वृत्तांत कथन केला . भगवंतांच्या नेणीवेतूनच प्रकट झालेल्या त्या कन्येला भगवंतांनी वर मागण्यास सांगितले. तिने भगवंतांना वरमागितला कि [१] सर्वतीर्थांमध्ये सर्वोत्तम सर्वविघ्नांचा नाश करणारी सर्वसिद्धी देऊ शकणारी अशी देवी होवून दे . . यावर तथास्तु!! म्हणून भगवान श्री विष्णूम्हणाले कि प्रत्येक पक्षाच्या अकराव्या दिवशी अर्थात एकादशीच्या तिथीस जे नरउपवास, नक्त भोजन अथवा एकभुक्त राहून दिवसभर तसेच

पुढे रात्रभर माझ्या भक्तीत रममाण होतील त्यांना धन, धर्म व मोक्ष मिळेल. . मित्रांनो एकादशीचा जन्म रात्रीचा आहे त्यामुळे एकादशीच्या रात्री भगवद्भक्ती चे कोणतेही साधन अंगीकारून भगवंतांच्या चिंतनात काल घालवणे अति पुण्यदायक असते. एकादशीच्या व्रताचे पारणे द्वादशीस दिवसा करावे.

ब्रह्मज्ञानी श्रीसुतमुनी ब्रह्मवृन्दांना संबोधित करताना सांगतात कि , १]चंद्रग्रहण अथवा सूर्यग्रहणातील स्नान २]अन्नदान अथवा जलदान ३]सुवर्ण दान ४]भूमिदान ५]कन्यादान ६]अश्वमेध आदी महान यज्ञ ७]चारधाम सारख्या मोठ्या तीर्थयात्रा

या महानपुण्यकारक गोष्टींपेक्षाही मोठे पुण्य एकादशीच्या व्रताने मिळते.

मोक्षदा एकादशी

कुरूक्षेत्राच्या रणभूमीवर भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला जो उपदेश केला ती गीता ! तो दिवस

मार्गशीर्ष शुध्द एकादशी हा होता. म्हणून या दिवसाला गीताजयंती असे म्हणतात. गीतेला आपण मोक्षदायिनी मानतो. म्हणून मग या एकादशीला मोक्षदा एकादशी असेही गौरविले गेले. ही मोक्षदा एकादशी आचरल्याने पितरांचा उध्दार होतो, त्यांना मोक्ष मिळतो, अशी परंपरेची श्रध्दा आहे. त्याची एक कथा आहे. ती कथा अशी - चंपक नगरीच्या वैखानस राजाच्या स्वप्नात एकदा त्याचे पितर आले. त्यांनी आपण सोसत असलेल्या नरकयातनांचे राजाकडे वर्णन केले. यामुळे दु:खी झालेल्या राजाने एका ऋषीला यावर उपाय सांगण्याची विनंती केली. त्या ऋषीने मोक्षदा एकादशी करण्याचा सल्ला राजाला दिला. त्याप्रमाणे राजाने मोक्षदा एकादशी केल्याने त्याच्या पितरांना मोक्ष मिळाला.

ही एकादशी निर्जला एकादशी सारखीच अतिमहत्त्वाची मानली जाते. म्हणजे ही एकादशी केली तर इतर सर्व एकादश्या केल्याचे पुण्य लाभते अशी लोक श्रध्दा आहे.

सफला एकादशी

पौष मासमध्ये कृष्ण पक्षाच्या एकादशीच्या दिवशी केले जाणारे हे व्रत आहे

शास्त्रानुसार, ती नावाप्रमाणेच मनोकामना पूर्ण करणारी एकादशी आहे.

जो व्यक्ती मनोभावे या एकादशीचे व्रत करतो आणि रात्री जागरण करतो त्याला वर्षानुवर्षाचे पुण्य प्राप्त होते. या दिवशी भगवान विष्णूची पूजाअर्चना करा, पहाटे उठून व्रताचे संकल्प करा. दिवसभर निराहार राहून सायंकाळी भगवानाला पिवळे वस्त्र, केळ आणि लाडूचा प्रसाद दाखवावा, सत्यनारायण कथापाठ करून आरती करा. या एकादशीच्या दिवशी तांदळाचा कोणताही पदार्थ बनवू नये किंवा भगवान विष्णूला तांदूळ अर्पण करू नये. दुसर्या दिवशी पहाटे सूर्य भगवानाला अघ्र्य अर्पण केल्यानंतर व्रताचे पारायण करावे.

पद्मपुराणात या एकादशीचे वर्णन आढळते. महाराज युधिष्ठिरने सांगितले की, हे जनार्दन पौष कृष्ण एकादशीचे काय नाव आहे? त्या दिवशी कोणत्या देवीदेवतांचे पूजन केले जाते? आणि त्याचा विधी काय आहे? कृपा करून मला सांगा. यावर भक्तवत्सल भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'हे धर्मराज, तुमच्याशी असलेल्या प्रेमपूर्वक संबंधामुळे तुम्हाला सांगतो की, एकादशी व्रताव्यतिरिक्त मी अधिकाधिक दक्षिणा देऊन यज्ञ करणार्यांनाही प्रसन्न होत नाही. त्यामुळे तिला अत्यंत भक्तिभाव आणि श्रद्धापूर्वक करा. त्यामुळे हे राजन तुम्ही द्वादशीयुक्त पौष कृष्ण एकादशीचे माहात्म्य एकाग्रचित्ताने ऐका. या एकादशीचे नाव सफला एकादशी आहे. या एकादशीचे देवता श्रीनारायण आहेत. अत्यंत विधिपूर्वक या एकादशीचे व्रत केले पाहिजे. ज्याप्रमाणे नागांमध्ये शेषनाग, पक्षामध्ये गरुड, सर्व ग्रहांमध्ये चंद्र, यज्ञामध्ये अश्वमेध आणि देवतांमध्ये भगवान विष्णू श्रेष्ठ आहेत त्याप्रमाणे सर्व व्रतांमध्ये एकादशीचे व्रत श्रेष्ठ आहे. जो व्यक्ती सदैव एकादशीचे

मन:पूर्वक व्रत करतो तो मला परमप्रिय आहे. आता या व्रताची विधी सांगतो, नीट लक्षपूर्वक ऐका.

'माझी पूजा करण्याकरिता ऋतूनुसार फळ, नारळ, लिंबू, नैवेद्यासह सोळा साहित्य गोळा करा. या साहित्याने पूजा झाल्यानंतर रात्री त्याला ग्रहण करा. या एकादशीच्या व्रताप्रमाणे यज्ञ, तीर्थ, दान, तप तसेच इतर दुसरे कोणतेच व्रत नाही. पाच हजार वर्षे तप केल्यानंतर जे फळ मिळते त्यापेक्षा जास्त सफला एकादशीचे व्रत केल्याने मिळते. त्यामुळे हे राजन आता या एकादशीची कथा सांगतो ती ऐका.'

चंपावती नगरीमध्ये एक महिष्मान नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला चार मुले होती. त्यातील लुम्पक नावाचा मोठा राजपुत्र महापापी होता. तो दररोज परस्त्री आणि वेश्यागमन तसेच इतर दुसर्या वाईट कामाकरिता पित्याच्या धनाचा दुरुपयोग करीत होता. तसेच देवता, ब्राह्मण, वैष्णवांची निंदा करीत होता. जेव्हा राजाला त्याच्या मुलाच्या या कुकृत्याबाबत कळले तेव्हा त्याने त्याला राज्यातून बाहेर हाकलून दिले. पित्याने हाकलून दिल्यानंतर काय करावे म्हणून

त्याने चोरी करण्याचा निश्चय केला. दिवसा तो जंगलात राहत होता आणि रात्री आपल्या पित्याच्याच नगरीमध्ये चोरी करीत असे. इतकेच नाही तर तो प्रजेला त्रास देत असे आणि कुकर्म करीत असे. त्याच्या या वाढत्या प्रकारामुळे जनता भयभीत झाली होती. त्यानंतर त्याने जंगलात राहत असताना पशुपक्ष्यांची शिकार करून त्याला खाऊ लागला. महिष्मान नगरीतील जनता त्याला पकडत तर असे, पण राजाच्या भीतीपोटी त्याला सोडून देत असे. ज्या जंगलामध्ये तो राहत होता त्या ठिकाणी एक भव्य आणि अतिप्राचीन पिंपळाचे झाड होते. नगरीतील जनता त्याची मनोभावे पूजा करीत असते. त्याच झाडाच्या खाली तो महापापी लुम्पक राहत होता. या जंगलाला जनता देवीदेवतांची नगरी मानत असत. काही काळ गेल्यानंतर लुम्पकच्या अंगावरील कपडे जीर्ण झाल्यामुळे निर्वस्त्र झाला. त्यात पौष कृष्ण पक्षातील दशमीच्या रात्री पडलेल्या कडाक्याच्या थंडीमुळे तो कडकडू लागला. दिवस उजाडता-उजाडता तो मूर्च्छित झाला. दुसर्या दिवशी सूर्योदय

झाल्यानंतर सूर्याच्या गर्मीमुळे त्याला जाग आली. कसाबसा स्वत:ला सावरत तो काही खायला मिळते का, हे पाहण्यासाठी फिरू लागला. पशुपक्ष्यांची शिकार करण्याइतकी शक्तीही त्याच्या अंगात राहिली नव्हती. त्यामुळे ज्या ठिकाणी झाडांची जमिनीवर पडलेली फळे दिसली. तो गोळा करून तो त्याच पिंपळाच्या झाडाखाली आला. तोपर्यंत सूर्य मावळतीला आला होता. तेव्हा आणलेली फळे त्याने झाडाच्या खाली ठेवली आणि परमेश्वरला प्रार्थना करून ती अर्पण केली. त्याच्या या उपवास आणि जागरणामुळे भगवान प्रसन्न झाले आणि त्याचे सर्व पाप नष्ट झाले.

दुसर्या दिवशी पहाटे एक अतिसुंदर घोडा आणि अनेक वस्तूंनी सजलेला एक रथ त्याच्यासमोर येऊन उभा राहिला. त्याचवेळी श्री नारायणाच्या कृपेने तुझे सर्व पाप नष्ट झाले असून आता तू पित्याकडे जाऊन राज्य प्राप्त कर, अशी आकाशवाणी झाली. ही वाणी ऐकून तो अत्यंत प्रसन्न झाला आणि दिव्य वस्त्र धारण करून 'भगवान की जय हो' असे म्हणत पित्याकडे

गेला.

पित्यानेही प्रसन्न होऊन संपूर्ण राजपाट त्याला सोपविला आणि धार्मिक कार्याकरिता निघून गेला. त्यानंतर चंपावती नगरीवर लुम्पक राजा राज्य करू लागला. त्याची पत्नी, पुत्र सगळेच भगवान नारायणाचे भक्त झाले. वृद्ध झाल्यानंतर लुम्पक आपल्या मुलाच्या हाती राज्यभार सोपवून तपस्या करण्याकरिता जंगलात निघून गेला. त्यानंतर तो वैकुंठास गेला. त्यामुळे जो मनुष्य या परमपवित्र एकादशीचे व्रत करतो त्या शेवटी मुक्ती मिळते. आणि जे हे व्रत करीत नाही ते पशूपेक्षा काही कमी नसतात. या सफला एकादशीचे व्रत केल्याने, माहात्म्य वाचल्याने किंवा श्रवण केल्याने मनुष्याला अश्वमेध यज्ञाचे फळ मिळते.'

पुत्रदा एकादशी

महाराज युधिष्ठिर यांनी विचारले,'हे परमेश्वरा! आपण

एकादशीचे महात्म्य सांगून आमच्यावर मोठी कृपा केली आहे. आता आम्ही आपल्याला विनंती करतो की, पौष शुक्ल एकादशीचे व्रत कशासाठी केले जाते, त्याचा विधी काय व व्रतात कोणत्या देवाची पूजा केली जाते.'

भक्तवत्सल परमेश्वर श्रीकृष्ण म्हणाले, 'हे राजन! या एकादशीचे नाव पुत्रदा एकादशी होय. या दिनी विष्णू नारायणाची पूजा केली जाते. या संपूर्ण संसारात पुत्रदा एकादशीच्या व्रतापेक्षा श्रेष्ठ असे एकही व्रत नाही. व्रताच्या पुण्याने मानव तपस्वी, विद्वान व धनवान होतो. यासंदर्भात एक कथा सांगतो ती लक्षपूर्वक ऐका.'

भद्रावती नावाच्या नगरीत सुकेतुमान नामक राजा राज्य करत असे. त्याला संतान नव्हते. त्याच्या पत्नीचे नाव शैव्या होते. ती निपुत्रिक असल्याने नेहमी दु:खी असायची. राजाकडे धन-संपत्ती, हत्ती, घोडे, मंत्री-संत्री सगळे होते, मात्र राजाला कुठल्याच गोष्टीत समाधान मिळत नव्हते.

मी मेल्यानंतर मला कोण पिंडदान करेल, याच विचारात राजा असायचा. मुलगा नसल्याचे आपण पुर्वज व देवाचे ऋण कसे चुकवू या विचारांनी राजाच्या मनात घर केले होते. ज्या घरात कुलदीपक नसेल त्या घरात नेहमी अंधार असतो, अशी राजाची समजूत झाली होती. कुलदीपकासाठी काही ना काही प्रयत्न केले पाहिजे असे,राजाला सारखे वाटायचे.

ज्या व्यक्तीने पुत्रमुख पाहिले आहे, तो धन्य आहे. अशा व्यक्तीला पृथ्वीलोकात यश व परलोकात शांती लाभत असते. पुर्वजन्माच्या पुण्याईने व्यक्तीला पुत्र, धनप्राप्ती होत असते. राजा अशा विचारात रात्रंदिवस गर् कअसायचा.

एकदा राजाने आत्मदहन करण्याचा निश्चय केला. मात्र, आत्महत्या करणे हे सगळ्यात मोठे पाप असल्याने त्याने निर्णय रद्द केला. एके दिवशी राजा घोड्यावर बसून जंगलात निघून गेला व तेथील झाडा-फुलाना न्याहाळू लागला. जंगलात त्यावेळी मोर, वाघ, सिंह, माकड, साप आदी मुक्तसंचार करत होते. हत्ती

त्याच्या पिल्लासह फिरत होता. राजाला जंगलात येऊन बराच कालावाधी होऊन देखील घरी परत जाण्याचे नाव घेत नव्हता. जंगलातील दृश्य पाहून तो विचार करत होता- 'मी आजपर्यंत यज्ञ केले, ब्राम्हण देवताला भोजन करून तृप्त केले तरी ही माझ्या वाट्याला दु:खच का आले असावे?'

विचारात मग्न असलेल्या राजाला पाण्याची तहान लागली. राजा इकडे-तिकडे पाण्याचा शोध घेऊ लागला. थोड्याच अंतरावर राजाला एक एक सरोवर दिसले. त्या सरोवरात सुंदर कमळ उमलले होते. हंस व मगर विहार करत होते. सरोवराच्या चहुबाजुंनी ऋषींचा आश्रम होता. त्याच वेळी राजाचा उजवा डोळा फडफडायला लागला. राजाला शुभशकुन प्राप्त होणार असल्याची जाणीव झाल्याने तो घोड्यावरून उतरून ऋषीमुनींना नतमस्तक होऊन त्यांच्यासमोर विराजमान झाला.

राजा पहातच एका ऋषीचे म्हटले - 'हे राजन! आम्ही आपल्यावर अत्यंत प्रसन्न झालो आहोत. आपल्या मनात असेल ते वर मागा.'हे एकताच राजा त्यांना

विचारले, 'महाराज आपण कोण आहात, येथे येण्याचे प्रयोजन काय?'

राजाच्या प्रश्नाला उत्तर देताना ऋषीने सांगितले, हे राजन! आज संतान देणारी पुत्रदा एकादशी आहे. आम्ही विश्वदेव असून आम्ही या सरोवरात स्नान करण्यास आले आहेत.

हे ऐकून राजाने म्हटले,'ऋषीदेवता मला संतान नाही, माझ्यावर कृपा करा, मला पुत्रप्राप्तीचे वरदान द्या.'

ऋषीमुनी म्हणाले -'हे राजन! आज पुत्रदा एकादशी आहे. हे व्रत आपण अवश्य करावे. परमेश्वर कृपेने आपल्या घरात लवकरच पाळणा हलेल.

ऋषीमुनींचे वाक्य ऐकून राजाने त्या दिवशी एकादशीचे व्रत केले व द्वादशीला या व्रताचे उद्यापन केले. ऋषीमुनींना दंडवत करून राजा महलात परतला. काही दिवसातच राणीला दिवस गेले. नऊ महिन्यानंतर राजाच्या घरी मुलाने जन्म घेतला. राजाला कुलदीपक मिळाला. राजाचा पुत्र अत्यंत शूरवीर,यशस्वी व प्रजापालक होता.

तात्पर्य हेच की, पुत्र प्राप्तीसाठी पुत्रदा एकादशीचे व्रत केले पाहिजे. जो व्यक्ती या व्रताचे माहात्म्याचे पठण किंवा श्रवण करतो त्याला मृत्युपश्चात स्वर्गात जागा मिळते.

षट्तिला एकादशी

या दिवशी मुख्यतः भगवान विष्णूंची पूजा केली जाते.धर्म ग्रंथानुसार या दिवशी तिळाचा 6 कामामध्ये उपयोग करण्याचे विधान आहे.हे 6 काम याप्रकारचे आहेत.

शास्त्रामध्ये लिहिण्यात आले आहे की...

तिलस्नायी तिलोद्वार्ती तिलहोमी तिलोद्की।

तिलभुक् तिलदाता च षट्तिला:पापनाशना:।।

षट्तिला एकादशी :पौष व. एकादशी दिवशीला प्रात:स्नान करून 'श्रीकृष्ण' या मंत्राचा ८, २८, १०८, किंवा १००० जप करावा. उपवास करून रात्री

जागरण करावे. हवन करावे. परमेश्वराचे पूजन करावे व

'सुब्रह्मण्य नमस्तेऽस्तु महापुरुष पूर्वज ।गृहाणार्घ्यं मया दत्तं लक्ष्म्यासह जगत्पते ॥'

या मंत्राने अर्घ्य द्यावेत. ही ' षट्तिला एकादशी आहे. यात तिळाच्या जलाने स्नान, तिळाचे उटणे, तिळाचे हवन, तिळजलप्राशन व तीळ मिसळलेले पाणी दान करावे. तिलमिश्रित मिष्टांन्ने भोजनात वापरावीत. म्हणजे सर्व पापांचा नाश होतो.

विजया एकादशी

विजया एकादशीची कथा वाचल्याने ऐकल्याने मिळते वाजपेय यज्ञाचे फळ.

हिंदू धर्मामध्ये एकादशीला फार महत्व आहे. एका वर्षात २४ एकादशी येतात. जेव्हा अधिकमहिना येतो तेव्हा यांची संख्या २६ असते. प्रत्येक एकादशीचे

विशेष महत्व आहे. त्यातील एक म्हणजे विजया एकादशी होय. विजया एकादशी तिच्या नावावरूनच ओळखल्या जाते. हि व्यक्तीला विजय देते. जेव्हा चारही बाजूंनी मनुष्य संकटामध्ये अडकतो त्याला स्वतःचा पराभव दिसू लागतो. अशा परिस्थिती मध्ये विजय मिळवायचा असल्यास विजया एकादशी चे व्रत हे सर्वोत्कृष्ट उपाय मानल्या जातो. हि एकादशी माघ/फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्षाला अकराव्या तिथीला येते.

व्रत कथा

कुंतीनंदन जया एकादशीचे महात्म ऐकून आनंदित होते. धन्य होत होते. जया एकादशीचे महात्म ऐकल्यावर कुंतीनंदन भगवान श्रीकृष्णांना विचारतात फाल्गुन महिन्यातील कृष्ण पक्षाला येणाऱ्या एकादशी चे काय महात्म आहे? कुंती नंदन खूप विनम्रतेने भगवान श्रीकृष्णाला प्रश्न विचारतात. त्यांची विनंती ऐकून भगवान श्रीकृष्ण म्हणाले फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्षाला येणाऱ्या एकादशीला विजया एकादशी म्हणतात. भगवान श्रीकृष्ण म्हणाले हे व्रत करणारा

व्यक्ती नेहमीच विजय प्राप्त करतो. भगवान श्रीकृष्ण म्हणाले हे कुंतीनंदन आपण माझे परम मित्र आहेत. आणि आपण खूपच चांगला प्रश्न केला आहे. या कथेला ऐकल्यावर आपणास आनंद मिळेल, तसेच हि कथा ऐकणे व वाचल्याने वाजपेय यज्ञाचे पुण्य प्राप्त होते. आता पर्यंत हि कथा मी कुणालाच सांगितली नाही. यापूर्वी हि कथा नारदजींनी ब्रह्माजी कडून ऐकली होती.

त्रेतायुगात भगवान श्रीहरी नारायणजीचे अवतार म्हणून प्रभू रामचंद्रांनी या सुंदर पृथ्वीवर जन्म घेतला होता. जेव्हा मर्यादा पुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र त्यांच्या पत्नीला सीतेला शोधत समुद्रा जवळ पोहचले. तिथेच समुद्र किनारी त्यांचा परम भक्त जटायू नावाचा पक्षी राहायचा. त्या जटायूने सांगितले कि सीता मातेला राक्षसराज लंकेश रावण समुद्राच्या पलीकडे लंकेत घेऊन गेलाय. त्याने मातेला अशोक वाटिकेत ठेवले आहे. जटायू कडून माहिती मिळाल्यावर प्रभू श्रीरामचंद्र वानर सेने सोबत आक्रमणाची तयारी करू लागले. पण एवढ्या मोठ्या समुद्राला कसे पार करावे

हा भीषण प्रश्न त्यांच्या समोर होता.

तेव्हा त्यांनी त्यांचे प्रिय बंधू लक्ष्मणजींना प्रश्न केला कि मला सांग तुझ्याकडे काही उपाय आहे का ? लक्ष्मण जी बोलले कि महान ऋषी वकदाल्भ्य मुनि हे इथून काही अंतरावरच राहतात त्यांचा आश्रम आहे त्यांना आपण भेटूया तेच आपणास पुढील मार्गदर्शन करतील. तेव्हा भगवान श्रीराम व लक्ष्मण महान ऋषी वकदाल्भ्य मुनि यांच्या आश्रमात पोहचले. त्यांना प्रणाम केला. व विनम्रतेने त्यांच्या पुढे हा भीषण प्रश्न प्रस्तुत केला.

वकदाल्भ्य मुनि म्हणाले हे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम मी आपणास विजय प्राप्त करून देणाऱ्या व्रता बद्दल माहिती देतोय. फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्षाला येणाऱ्या एकादशी चे व्रत तुम्ही करा हे केल्यास निश्चितच तुम्ही समुद्र पार करून रावणाला पराजित करणार यात संशय नाही.

विजया एकादशी व्रत कसे करावे याबद्दल ऐकून घ्या. या एकादशीला अशी मान्यता आहे कि स्वर्ण दान,

भूमि दान, अन्नदान आणि गौदान करून पुण्यफळाची प्राप्ती करू शकता. या दिवशी श्रीहरी नारायणजीची पूजा केल्या जाते. व्रत पूजेत धूप,दीप,नैवेद्य, नारळाचा प्रयोग केल्या जातो. सप्त धान्य घट स्थापना केल्या जाते. सप्त धान्य- गहू, उडीद, मुंग, चना, जौ, तांदूळ, आणि मसूर आहे. यावर श्रीविष्णुजींची मूर्ती ठेवल्या जाते. या व्रताला करणारा व्यक्ती पूर्ण दिवस व्रत करून रात्री विष्णु पाठ करत जागरण करतो. हे व्रत २४ तासांसाठी केल्या जाते. या व्रताची पूर्णता द्वादशीला सकाळी दान धर्म करून, अन्नदान करून केलॆल्या जाते.

प्रभू श्रीरामचंद्र यांनी लक्ष्मण व संपूर्ण वानर सेने सह महर्षीजींनी सांगितलेल्या तिथीनुसार एकादशी व्रत संपन्न केले. प्रभू श्रीरामचंद्र संपूर्ण वानर सेनेसमेत समुद्र पार करून लंकेत पोहचले व रावणाचा अंत केला.

अशाप्रकारे भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्या परम मित्राला सांगितले कि या एकादशीला जो व्रत उपवास करतो त्याचे विघ्न दूर होतात. तसेच त्याचे पाप नष्ट होते.

आणि त्यावर कितीही मोठे संकट असो तो त्यावर मात करून विजय प्राप्त करतो. अशाप्रकारे विजया एकादशीचा महिमा सांगितला.

आमलकी एकादशी

या एकादशीचे पवित्र व्रत विष्णू लोकाची प्राप्ती करून देणारे आहे.

हिंदू धर्मामध्ये एकादशीला फार महत्व आहे. एका वर्षात २४ एकादशी येतात. जेव्हा अधिकमहिना येतो तेव्हा यांची संख्या २६ असते. प्रत्येक एकादशीचे विशेष महत्व आहे. त्यातील एक म्हणजे आमलकी एकादशी होय. आमलकी म्हणजे आवळा जसे नदीमध्ये श्रेष्ठ स्थान गंगा नदीला आहे, देवांमध्ये श्रीहरी नारायणजींना श्रेष्ठ स्थान आहे. तसेच आवळ्याला शास्त्रामध्ये श्रेष्ठ स्थान प्राप्त झालेले आहे. नारायणजींनी सृष्टी रचनेसाठी ब्रह्माजींना जन्म दिला त्यांनी सृष्टीची रचना केली. तेव्हाच आवळ्याच्या

वृक्षाला सुद्धा जन्म दिला. आवळ्याचे झाड हे पूजनीय आहे त्याच्या प्रत्येक अंगात ईश्वराचे स्थान आहे.

व्रत कथा

कुंतीनंदन विजया एकादशीचे महात्म ऐकून आनंदित होते. धन्य होत होते. विजया एकादशीचे महात्म ऐकल्यावर कुंतीनंदन भगवान श्रीकृष्णांना विचारतात फाल्गुन महिन्यातील शुक्ल पक्षाला येणाऱ्या एकादशी चे काय महात्म आहे? कुंती नंदन खूप विनम्रतेने भगवान श्रीकृष्णाला प्रश्न विचारतात. त्यांची विनंती ऐकून भगवान श्रीकृष्ण म्हणाले फाल्गुन महिन्याच्या शुक्ल पक्षाला येणाऱ्या एकादशीला आमलकी एकादशी म्हणतात. भगवान श्रीकृष्ण म्हणाले हे कुंतीनंदन या एकादशीचे पवित्र व्रत विष्णू लोकाची प्राप्ती करून देणारे आहे.या व्रताची एक प्राचीन कथा आहे ती मी आपणास सांगतो. ती शांत पूर्वक ऐका

प्राचीन काळी महान राजा मान्धाताने वशिष्ठ ऋषींना प्रश्न केला की, महर्षीजी आपण जर माझ्यावर प्रसन्न आहात तर मला असे व्रत सांगा की ज्याने माझे कल्याण होईल.

महर्षी वशिष्ठजी बोलले – हे राजा सर्व व्रतांमध्ये उत्तम जे शेवटी मोक्ष देते असे व्रत म्हणजे आमलकी एकादशी चे व्रत होय.

राजा मान्धाता बोलले – महर्षीजी मला सांगा या आमलकी एकादशीच्या व्रताची उत्पत्ती कशी झाली? हे व्रत कसे करतात.

महर्षी वशिष्ठजी बोलले – हे राजा मी तुम्हाला या व्रताची पूर्ण माहिती देतो. हे व्रत फाल्गुन शुक्ल पक्षात येते. या व्रताचे फळ प्राप्त केल्याने सर्व पाप नष्ट होतात. या व्रताचे पुण्य एक हजार गायीचे दान केल्याने जे पुण्य मिळते तेवढे आहे. आमलकी म्हणजे आवळा यांची उत्पत्ती हि भगवान विष्णूच्या मुखातून झाली. मी आता तुम्हाला फार जुनी कथा सांगतो ती एका.

प्राचीन काळी वैदिक नावाचे नगर होते. त्यानगरात ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय, शूद्र या चारी वर्णातील लोक फार प्रसन्न पूर्वक राहत होते. या नगरात नेहमीच वेदांचे पठण होत असे. त्या नगरात कोणीच पापी,

दुराचारी, नास्तिक असे कोणीच नव्हते. नगरामध्ये चैत्ररथ नावाचे चंद्रवंशी राजा राज्य करीत होते. ते फार विद्वान व धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांच्या राज्यात कोणीच गरीब नव्हते. त्या राज्यातील प्रजा ही विष्णू भक्त होती. तेथील लहान मोठे सर्व व्यक्ती एकादशीला उपवास करीत होते.

एकदा फाल्गुन शुक्ल पक्षात आमलकी नावाची एकादशी आली. त्या दिवशी राजा व प्रजा यांनी आनंद पूर्वक एकादशीचा उपवास केला. राजाने आपल्या प्रजे बरोबर मंदिरामध्ये कळसाची स्थापना केली व धूप, दीप व नैवेद्य यांनी पूजा करीत होते. त्यांनी आवळा वृक्षाचे पण पूजन केले. त्यांची स्तुती केली व प्रार्थना केली की, माझ्या सर्व पापाचा सर्वनाश करा. त्या रात्री तेथे सगळ्यांनी जागरण केले. त्याच रात्री तेथे एक शिकारी आला. तो महापापी व दुराचारी होता. आपल्या कुटुंबाचे पालन पोषण तो शिकार करून करत असे. त्या शिकाऱ्याला फार भूक लागली होती त्याला वाटले की येथे जेवणाची व्यवस्था किंवा प्रसाद तरी मिळेल या उद्देशाने तो आला होता. तो

मंदिरात एका कोपऱ्यात बसून होता. त्या ठिकाणी तो बसून एकादशीची व्रत कथा व महात्म ऐकत होता. या प्रकारे त्या शिकाऱ्याने संपूर्ण रात्र इतर लोकांसोबत जागरण करून काढली. सकाळी सगळे आपआपल्या घरी निघून गेले. शिकारी पण घरी गेला व जेवण केले. काही दिवसाने त्या शिकाऱ्याचा मृत्य झाला. तो फार पापी होता त्याला नरकात जावे लागणार होते पण त्या दिवशी न कळत त्याच्या कडून एकादशीचे व्रत, उपवास व जागरण झाले होते. त्यामुळे त्याचे सर्व पाप नष्ट झाले होते व त्याला पुण्याची प्राप्ती झाली होती.

त्याला पुढील जन्म देण्यात आला. त्याचा राजा विदुरथच्या घरी जन्म झाला. त्यांचे नाव वसुरथ असे ठेवण्यात आले. वसुरथ पुढे तिथला राजा बनला व तेथे चांगल्या प्रकारे राज्य केले. त्याच्या चेहऱ्यावरील तेज सूर्या प्रमाणे होते, त्याची कांती चंद्रा प्रमाणे, क्षमेची प्रवृत्ती पृथ्वी प्रमाणे होती. तो अत्यंत धार्मिक, सत्यवादी, कर्मवीर आणि विष्णु-भक्त होता. तो प्रजेला पुत्रवत प्रेम देत असे रोज दान धर्म करत असे.

एकदा राजा वसुरथ शिकार करण्या करता गेला. त्याला दिशेची माहिती नसल्यामुळे जंगलात तो रास्ता भटकला. तेथेच एका झाडाखाली तो झोपला. काही वेळाने तेथे डाकू आले राजाला एकटे पाहून ते ओरडत होते मारा याला मारा. या राजाने आपल्या वडील, आजोबा व इतर भाऊ बांधवांना मारले व काहींना राज्यातून काढून टाकले. आता आपण याला मारून बदला घ्यायला पाहिजे. एवढे म्हणून डाकू राजाला मारू लागले. डाकू अस्त्र -शस्त्राने राजा वर वार करीत होते. परंतु ते अस्त्र-शस्त्र राजाच्या शरीराला लागताच नष्ट होत होते व राजाला फुलांप्रमाणे जाणवत होते. देवाच्या कृपेने डाकूंचे अस्त्र-शस्त्र हे त्यांचेच त्याच्या वर उलट प्रहार करत होते त्यात सर्व डाकू जखमी होऊन बेशुद्ध झाले. तेव्हा राजाच्या शरीरातून एक सुंदर स्त्री बाहेर पडली त्यांनी विविध अलंकार घातलेले होते. त्यांचे डोळे भयंकर लाल जणू डोळ्यातून आग निघू पाहत आहे असे. तेव्हा त्या मृत्यूच्या देवी प्रमाणे दिसत होत्या. त्यांनी काही क्षणातच त्या सर्व डाकूंचा वध केला.

राजा जेव्हा झोपेतून उठले त्यांनी पहिले की त्यांच्या आजू बाजूला कित्येक डाकू मरून पडले आहे. ते विचार करत होते की आपल्याला कोणी बरे वाचवले? कोणी जवळचा व्यक्ती तर नव्हे? हे विचार करीत असतांना आकाश वाणी झाली की भगवान विष्णूजींच्या शिवाय तुमचे रक्षण आणखी कोण करणार. हि आकाशवाणी ऐकून राजाने भगवान विष्णूचे स्मरण करत त्यांना प्रणाम केला व आपल्या राज्यात परत सुखरूप आले.

वशिष्ठ ऋषी बोलले – राजा हा सर्व आमलकी एकादशी व्रताचा प्रभाव आहे. जो कोणी आमलकी एकादशी चे व्रत करतो, तो प्रत्येक कार्यामध्ये यश प्राप्त करतो व शेवटी वैकुंठ धाम प्राप्त करतो.

पापमोचनी एकादशी

चैत्र महिन्यातील कृष्ण पक्षाच्या एकादशीला पापमोचनी एकादशी म्हणतात. ही एकादशी सर्व

पापांचा नाश करणारी असते. यंदा ही एकादशी 24 मार्च, शुक्रवारी आहे. या व्रताची विधी या प्रकारे आहे -

व्रत विधी

पापमोचनी एकादशीच्या विषयावर भविष्योत्तर पुराणात विस्तारात वर्णन करण्यात आले आहे. या व्रतात विष्णूच्या चतुर्भुज रूपाची पूजा केली जाते. एकादशीच्या दिवशी सकाळी स्नान आदी करून व्रताचे संकल्प करावे. संकल्प केल्यानंतर षोडशोपचार (16 साहित्याने) समेत विष्णूची पूजा करायला पाहिजे.

पूजा केल्यानंतर देवासमोर बसून भगवद् कथेचा पाठ करावा किंवा एखाद्या योग्य ब्राह्मणाकडून करवून घ्यावा. कुटुंबियांसमेत बसून भगवद् कथा ऐकायला पाहिजे. रात्रभर जागरण करावे.

द्वादशी तिथी (25 एप्रिल, शनिवार)ला सकाळी स्नान करून विष्णूची पूजा केली पाहिजे नंतर ब्राह्मण भोज करवून दक्षिणा समेत त्यांना विदा केले पाहिजे. त्यानंतर स्वत:ने भोजन केले पाहिजे. या प्रकारे

पापमोचनी एकादशीचा व्रत केल्याने विष्णू प्रसन्न होतात आणि व्रतीच्या सर्व पापांचा नाश होतो.

पापमोचनी एकादशी व्रत कथा

फार वर्ष आधी मांधाता नावाचा एक पराक्रमी राजा होता. राजा मांधाताने लोमश ऋषीला विचारले की जर मनुष्याकडून नकळत काही पाप झाले असतील तर त्यातून कशा प्रकारे मुक्ती मिळवू शकतो? तेव्हा लोमश ऋषींनी राजाला एक कथा सांगितली की चैत्ररथ नावाचे सुंदर वनात च्यवन ऋषीचे पुत्र मेधावी ऋषी तपस्येत लीन होते. या वनात एक दिवस मंजुघोषा नावाच्या अप्सरेची दृष्टी ऋषींवर पडते, तेव्हा ती त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करू लागते.

कामदेव त्या वेळेस तेथून जात होते. त्यांची दृष्टी अप्सरेवर गेली आणि ते तिची मदत करू लागले. अप्सरा आपल्या प्रयत्नात यशस्वी झाली आणि ऋषीची तपस्या भंग झाली. ऋषी महादेवाच्या तपस्येचे व्रत विसरून गेले आणि अप्सरासोबत रमण करू लागले. बर्याच वर्षांनंतर जेव्हा त्यांची चेतना जागली तेव्हा त्यांना भास झाला की ते महादेवाच्या

तपस्येने विरक्त झाले आहे. त्यांना त्या अप्सरावर फार क्रोध आला आणि तपस्या भंग करण्याबद्दल दोषी असल्यामुळे ऋषीने अप्सराला श्राप दिला की तू पिशाचिनी बनून जा.

श्रापाने दुखी होऊन ती ऋषीच्या पायात पडली आणि श्रापापासून मुक्ती मिळवण्यासाठी प्रार्थना करू लागली. ऋषीने तेव्हा त्या अप्सरेला विधी सहित चैत्र कृष्ण एकादशी (पापमोचिनी एकादशी)चे व्रत करण्यास सांगितले. विलासितेत रमलेल्या ऋषीचे तेज देखील लोप झाले होते. म्हणून ऋषीने देखील या एकादशीचे व्रत केले, ज्याने त्याचे पाप नष्ट झाला. तिकडे अप्सरा पण या व्रताच्या प्रभावामुळे पिशाच योनीतून मुक्त झाली आणि तिला सुंदर रूप प्राप्त झाला व ती परत स्वर्गात गेली.

एकादशीचे अभंग

एकादशीस अन्नपान । जे नर करिती भोजन ।

श्वानविष्ठेसमान । अधम जन ते एक ॥१॥

ऐका व्रताचें महिमान । नेमें आचरती जन । गाती ऐकती हरिकिर्तन । ते समान विष्णुसीं ॥२॥

अशुद्ध विटाळशीचे खळ । विडा भक्षितां तांबुल । सांपडे सबळ । काळाहातीं न सुटे ॥३॥

सेज बाज विलास भोग । करिती कामिनीचा संग । तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ॥४॥

आपण नवजे हरिकीर्तना । आणिकां वारी जातां कोणा । त्याच्या पापें जाणा । ठेंगणा तो महोमेरु ॥५॥

तया दंडी यमदुत । झालेस तयाचे अंकित । तुका म्हणे व्रत । एकाद्शी चुकलिया ॥६॥

*

पंधरा दिवसां एक एकादशी । कां रे न करिसी व्रतसार ॥१॥

काय तुझा जीव जातो एका दिसें । फ़राळाच्या मिसें धनी घेसी ॥२॥

स्वहित कारण मानवेल जन । हरिकथ पूजन वैष्णवांचे

॥३॥

थोडे तुज घरीं होती उजगरे । देउळासी कां रे मरसी जातां ॥४॥

तुका म्हणे कां रे सकुमार झालासी । काय जाब देसी यमदुतां ॥५॥

अशोककाका कुलकर्णी

९०९६३४२४५१